# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २२ नोव्हेंबर २०२३




## दैनिक आधुनिक केसरी वाचा आता

## एऑन प्लेच्या प्लॅटफॉर्मवर

# AEONPLAY




तर मग डाउनलोड करा → एऑन प्ले





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

परवा मला कुणीतरी एक व्हिडीओ पाठवला. त्यात एक कुटुंब एक सण साजरा करतंय. व्हिडीओ बहुधा अमेरिकेतला असावा. त्या सणाला ते थँक्स गिव्हिंग डे म्हणतात. आपण त्याला कृतज्ञता दिन म्हणू या. साधारणपणे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी हा सण साजरा करतात. या दिवशी राष्टीय सुटी असते. शेतीचा हंगाम निघालेला असतो. वर्षही लवकरच संपणार असते. या पार्श्वभूमीवर सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा होतो. या वेळी कुटुंबातले सर्व जण एकत्र येऊन हा सण साजरा करतात अशी पद्धत आहे. या सणाशी अनेक आख्यायिका निगडित आहेत. आपल्याला त्याच्या खोलात जायचे नाही. फक्त संदर्भ लक्षात यावा म्हणून हे सर्व सांगितलं. त्या व्हिडिओत एक तरुण मुलगा, त्याची आई आणि आजोबा अशी पात्रं आहेत. आजोबा एकटेच राहतात. मुलगा सगळ्या आधुनिक ( पण नको त्या ) गोष्टींचं वेड लागून बिघडला आहे. त्याला खाण्यासाठी चमचमीत हवं असतं. वेळ घालवण्यासाठी मोबाईल/आयपॅड हवा आहे. झोपण्यासाठी अत्याधुनिक बेडरूम, गाद्या इ गोष्टी हव्या आहेत. होतं असं की एकदा आजोबांच्या घरी हा थँक्सगिव्हिंग कार्यक्रम आयोजित केलेला असतो. आजोबा एकटेच राहत असल्याने आणि त्यांची आर्थिक परिस्थिती साधारण असल्याने त्यांनी त्यांच्या आर्थिक क्षमतेप्रमाणे या कार्यक्रमाचे नियोजन केलेले असते. त्यांचं घरही तसं छोटेखानी. बेडरूम वगैरे लहानच. तर अशा या आजोबांच्या घरी त्यांची मुलगी म्हणजेच त्या मुलाची आई आपल्या मुलाला घेऊन जाते. आजोबांकडे केवळ जाण्याच्या कल्पनेनेच तो तरुण मुलगा नाक मुरडतो. पण आई आग्रह करते म्हणून थोड्या नाखुशीनेच तिच्याबरोबर जातो. जाताना खूप कुरकुर करतो. आजोबा दरवाजात उभे राहून प्रेमाने त्यांचं स्वागत करतात पण हा त्यांच्याकडे लक्षही देत नाही. त्याची आई त्याबद्दल आजोबांकडे दिलगिरी व्यक्त करते. नंतर त्या ठिकाणी जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले असते. पण जेवणात चिकनचा समावेश नाही म्हणून हा मुलगा जेवण करण्याचं नाकारतो. झोपण्यासाठी चांगली सोय नाही म्हणून तिथे झोपण्याचं नाकारतो. आपल्या चुलत भावंडांबरोबर खेळण्याऐवजी त्याला आयपॅड खेळण्यासाठी हवं असतं.



## आनंदी पहाट

### निर्णयप्रक्रिया महत्वाची

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

निर्णय घेणे ही निर्णय ओळखून, माहिती गोळा करून आणि पर्यायी ठरावांचे मूल्यांकन करून निवड करण्याची प्रक्रिया आहे. प्रत्येक वेळी निर्णय घेण्याची प्रक्रिया वापरणे तुम्हाला संबंधित माहिती आयोजित करून आणि पर्याय परिभाषित करून अधिक जाणूनबुजून, विचारपूर्वक निर्णय घेण्यास मदत करू शकते. हा दृष्टिकोन तुम्हाला सर्वात समाधानकारक पर्याय निवडण्याची शक्यता वाढवतो.
आपण निर्णय घेणे आवश्यक आहे हे लक्षात येते. आपण घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप स्पष्टपणे परिभाषित करण्याचा प्रयत्न करावा. तुमचा निर्णय घेण्यापूर्वी काही समर्पक माहिती गोळा करावी. कोणती माहिती आवश्यक आहे, माहितीचे सर्वोत्तम स्रोत आणि ती कशी मिळवायची हे समजून घेणे आवश्यक असते. काहीवेळा अंतर्गत आणि बाह्य दोन्ही कार्य समाविष्ट असते. काही माहिती अंतर्गत असून तुम्ही ती स्व-मूल्यांकन प्रक्रियेद्वारे शोधू शकता इतर माहिती बाह्य स्वरूपातील असते. तुम्हाला ती ऑनलाइन, पुस्तकांमध्ये, इतर लोकांकडून आणि इतर स्त्रोतांकडून मिळू शकते. तुम्ही माहिती गोळा करताच, तुम्हाला कदाचित कृतीचे अनेक संभाव्य मार्ग किंवा पर्याय ओळखता येतील. नवीन पर्याय तयार करण्यासाठी तुम्ही तुमची कल्पनाशक्ती आणि अतिरिक्त माहिती देखील वापरता येऊ शकते. सर्व संभाव्य आणि इष्ट पर्यायांचा विचार करणे योग्य ठरते. तुम्ही कठीण अंतर्गत प्रक्रियेतून जात असताना, तुम्ही काही विशिष्ट पर्यायांना पसंती देण्यास सुरुवात करावी लागते. ज्यांच्याकडे स्वतःचे ध्येय गाठण्याची उच्च क्षमता आहे, ते स्वतःच्या मूल्य प्रणालीवर आधारित, प्राधान्य क्रमाने पर्याय तेवून निर्णय घेऊन शकतात. तुमच्या निर्णयाचे परिणाम विचारात घेऊन ओळखलेल्या गरजेचे निराकरण केले आहे की नाही याचे मूल्यमापन करावे. जर निर्णयाने ओळखल्या गेलेल्या गरजा पूर्ण केल्या नाहीत, तर तुम्ही प्रक्रियेच्या काही कार्यांची पुनरावृत्ती करावी लागते.



आधुनिक केसरी

### मौनाचा संवाद | सिध्दकासी ||

पिकलिया फळा | रसाचि आवडी ||
तैसी लागो गोडी | चिंतनाची ||१||
टवाळाच्या संगे | घलविता काळ ||
ज्ञानियांचा मेळ | भाळी कैसा ? ||२||
विनोदाच्या अंगी | असावे बंधन ||
बोधाचे लिंपण | हितकारी ||३||
अनुभवा पोटी | अमृताचे घट ||
दाखवितो वाट | आनंदाची ||४||
साधकाच्या अंगी | नसावा प्रमाद ||
मौनाचा संवाद | सिध्दकासी ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

मायबाप बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी ।
अत्यंत लोधला पापिणीं । अविद्येनें भुलविला ॥४०॥
संभोग नस्तां इतुका प्रेमा । योग्य जालिया उलंघी सीमा ।
प्रीती वाढविती कामा- । करितां प्राणी गुंतला ॥४१॥
जरी न देखे क्षण येक डोळां । तरी जीव होय उताविळा ।
प्रीतीपात्र अंतर्कळा । घेऊन गेली ॥४२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

सत्य असत्य का वोध है, समाधिस्थ जन होय । अनुभव सत विज्ञान है, अन्य न जाने कोय ।।३६।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/३६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
समाधिस्थ योगेश्वराना सत्याचे यथार्थ ज्ञान असते कारण ते योग-समाधीच्या अनुभव, साक्षात्काराद्वारे समस्त तत्त्वांना जाणतात. समाधी विज्ञानात कुठलीच वस्तू अदृश्य रहात नाही. म्हणून आप्त पुरुषांचे वचनच जगासाठी प्रमाण आहेत. त्या आप्त योगेश्वरांच्या द्वारेच सत्य-असत्याचा बोध होतो. या व्यतीरिक्त सत्याचे वास्तविक निभ्रांत ज्ञान इतरांना होत नाही. म्हणून वाचकज्ञानींच्या वचनांचा त्याग करून सद्गुरूंचे निभ्रांत वचन श्रवण करून सत्य-सिद्धांतावर आपले जीवन गतीमान करावे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास




यानंतर इतिहासाचार्य राजवाड्यांनाही या पत्राच्या काही नकला सापडल्या. शिवाय, अनेक नकला पुणे पुराभिलेखागारात इनाम कमिशनच्या दफ्तरातही सापडतात; पण या सगळ्या नकला अथवा मूळ पत्राच्या कॉपी असून मूळ पत्र हे अनेक वर्षे कोणाच्याही पाहण्यास आले नव्हते. अखेरीस मे २०१७ मध्ये लंडनच्या 'ब्रिटिश लायब्ररी'त या मूळ पत्राची फोटोझिंकोग्राफ तंत्रज्ञानाने बनवलेली एक प्रत इतिहास अभ्यासक संकेत कुलकर्णी यांना सापडली असून, महाराष्ट्रात आजवर सापडलेल्या नकलांवर जे शेरे आहेत, त्याबरहुकूम ही प्रत असल्याचे सिद्ध होत आहे. सदर सनदेवर छत्रपती शिवाजी महाराजांनी लिहिलेली 'मर्यादेयं विराजते' अशी अक्षरे आहेत. पत्राच्या मुख्य बाजूवरचे अक्षर आवजी चिटणिसांच्या हस्ताक्षराशी मिळतेजुळते आहे.
'श्रीसद्‌गुरुवर्य, श्रीसकळतीर्थरूप, श्रीकैवल्यधाम, श्रीमहाराज श्रीस्वामी, स्वामींचे सेवेसी चरणरज सिवाजीराजे चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापनाजे'', अशा मायन्याने हे पत्र सुरू होते. त्यापुढे शिवाजी महाराजांनी स्वतःच्या शब्दात पूर्वी समर्थांनी त्यांना काय उपदेश केला, त्याबद्दल थोडक्यात लिहिले आहे. रामदासस्वामी अद्वैत तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. केवळ ब्रह्म हेच सत्य आहे हा विचार त्यांच्या साहित्यात सर्वत्र दिसतो. त्यांच्या तत्त्वज्ञानास संत एकनाथांच्या वाङ्मयाची बैठक होती. दासबोधाच्या बहुतेक सर्व दशकांमध्ये ब्रह्म%, माया, जीव, जगत्, परमेश्वर इत्यादी गोष्टींची चर्चा आहे. पंचीकरण हा विषय समर्थांनी अतिशय सखोलपणे सांगितला आहे. परब्रह्म, मूळमाया, गुणमाया, त्रिगुण, पंचमहाभूते, अष्टधा प्रकृती, विश्वाची उभारणी व संहार, पिंड-ब्रह्मांड रचना व त्यांचे संबंध अशा अनेक विषयांचे चिंतन समर्थांच्या साहित्यात आहे. सर्व कर्मांचा कर्ता हा राम असून, आपण मिथ्या अहंकारामुळे स्वतःकडे कर्तेपण घेतो असे ते सांगतात. समर्थ रामदास स्वामी स्वतः सदैव विदेही अवस्थेमध्ये असल्याने त्यांचे हे अनुभवज्ञान त्यांनी ग्रंथरूपाने मांडले.त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. भक्ती केल्यामुळे देव निश्चितपणे प्राप्त होतो असे त्यांनी दासबोधाच्या सुरुवातीलाच सांगितले आहे. त्यांनी स्वतः १२ वर्षे नामस्मरण भक्ती केली व त्याचा प्रसार केला.

## 'मी फक्त एका नामातच आहे.'

आधुनिक केसरी

मनुष्य कितीही मोठा असला, उत्तम पुराण आणि प्रवचन सांगणारा जरी असला, तरी तो जर नामात रहात नसेल किंवा त्याच्या संगतीत परमेश्वराचे प्रेम लागत नसेल, तर तो कदापिही संत म्हणून समजला जाणार नाही. संतांचे नातेवाईक संत असतातच असे नव्हे. आपण नोकरी केली तर आपला मुलगा नोकरी करीलच असे काही नाही; तसेच जो भगवंताचा आहे त्याचा मुलगा भगवंताचा असेलच असे नाही. संत जरी झाला तरी त्याने चार माणसांसारखेच वागावे. काहीतरी वागणे हे संताचे वागणे नव्हे. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण होय; कारण ' सर्व ठिकाणी मीच आहे ' ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. साधूच्या अंतःकरणामध्ये भयाचा संकल्प नसल्यामुळे वाघ, सिंह, साप त्याला त्रास देत नाहीत. अगदी जंगली वाघाकडे देखील निर्भयतेने नजरानजर केली तर तो अंगावर येत नाही; शिवाय, साधूंच्या शुद्ध अंतःकरणाचाही त्याच्यावर परिणाम होतो. अशा रीतीने, संतांच्या अंतःकरणाची प्राणिमात्रांनासुद्धा जाणीव असते. अशा संतांचा सहवास मिळणे ही फार भाग्याची



गोष्ट आहे. परमेश्वराचे प्रेम लागणे किंवा सतत मुखात नाम येणे, हेच संतांच्या संगतीत राहून साधायचे असते. संतांची अखंड संगत नामानेच ठेवता येईल. जिथे नाम आहे तिथे संतांचा सहवास आहे. तुकाराम महाराजांसारखे संतसुद्धा देवापाशी मागताना ' तुझा विसर न पडावा ' हेच मागतात. तसेच रामदासस्वामी देवाला म्हणतात, 'तुझा योग, म्हणजे तुझा सहवास, मला नित्य घडू दे.'
' योग असणे ' म्हणजे दुसरे काही नसून, मन जेव्हा अनुसंधानापासून अलिप्त होऊन इतर विचारांत भरकटते, तेव्हा त्याला आवरून परत अनुसंधानात लावणे. हीच योगशक्ती.
हुकूम कितीही कडक असेना का, परंतु त्याच्याखाली जर सही नसेल तर त्या हुकुमाला महत्त्व नाही. साहेबाच्या सहीच्या कागदाला महत्त्व आहे. नाम हे सर्व साधनांत सहीसारखे आहे. एका मुलाला अत्यंत राग येत असे. रागाच्या भरात तो आपले डोके आपटून घेई. त्याला मी सांगितले, ' रोज स्नान झाल्यावर आपल्या पोटावर गंधाने रामनाम लिहून ठेव, आणि ज्या ज्या वेळी राग येईल त्या त्या वेळी त्या नामाकडे पहा; ' आणि त्या प्रयोगाने त्या मुलाचा राग आपोआप शांत झाला. खरोखर, नामात किती प्रचंड शक्ती आहे ! अनुभव घेऊनच पहा. मी आजपर्यंत सर्वांना नामच सांगत आलो आहे.
मी इथे नाही, मी तिथे नाही, मी गेलो नाही, मी जात नाही; मी फक्त एका नामातच आहे. ज्याच्याजवळ भगवंताचे नाम आहे, त्याच्या मागे-पुढे मी आहेच. **१६७. तुम्ही भगवंताचे नाम घ्यावे ह्यापलीकडे, सत्य सांगतो, मला कसलीही अपेक्षा नाही.**

बुधवार, २२ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १०४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 22 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-104 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


## विमा कंपनीच्या अधिकाऱ्याला फासले काळे

### ठाकरे गटाचे आंदोलन : शेतकऱ्यांना अल्प नुकसान भरपाई

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ : शेतकऱ्यांना अत्यल्प विमा परतावा मिळाल्याने शिवसेना ठाकरे गट संतप्त झाला आहे. पीक विमा कंपनीच्या व्यवस्थापकासह जिल्हा कृषी अधीक्षक यांना यवतमाळ तालुक्यातील कारेगाव यावली शेतशिवारात पाहणीसाठी नेले. तेथे विमा कंपनीच्या धोरणांचा निषेध करीत संतप्त शिवसैनिकांनी रिलायन्स विमा कंपनीच्या अधिकाऱ्यास मंगळवारी दुपारी मारहाण केली. या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.**



यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १० रुपयापेक्षाही कमी पीक विमा नुकसानभरपाई मिळाली आहे. जिल्ह्यातील ७८ शेतकऱ्यांना विमा कंपनीने पाच रुपयांपेक्षा कमी मदत दिल्याचा प्रकार समोर आला. दिवाळीपूर्वी विमा कंपनीने ५९ हजार शेतकऱ्यांना ४१ कोटींची मदत जाहीर केली. या मदत यादीतील नऊ हजार ७२७ शेतकऱ्यांना एक हजार रुपयेसुद्धा मदत मिळाली नाही. अनेक शेतकऱ्यांना दोन, पाच, दहा रुपये, अशी नुकसानभरपाई मिळाली आहे. काही शेतकऱ्यांच्या खात्यात २००, ५००, एक हजार रुपयांची मदत जमा झाल्याचा प्रकार जाहीर केलेल्या यादीतून समोर आला आहे.विमा कंपनीने शेतकऱ्यांची थट्टा लावल्याने शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला. विमा कंपनीच्या व्यवस्थापकास व कृषी अधीक्षकांना शेतीच्या बांधावर नेत, पिकांची स्थिती दाखवून प्रश्नांची सरबत्ती केली. विमा प्रतिनिधी समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. त्यामुळे संतप्त शिवसैनिकांनी विमा कंपनीच्या व्यवस्थापकास बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हीडिओ समाज माध्यमात व्हायरल झाला आहे. प्रकारानंतर जिल्हा कृषी अधीक्षक यांनी विमा कंपनीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना या पद्धतीने मारहाण करू नये, असे आवाहन केले. या मारहाणप्रकरणी विमा कंपनीने पोलिसात तक्रार दिली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे किशोर इंगळे आणि संजय रंगे यांनी जिल्ह्यात पीक विमा वाटपात घोळ झाल्याचा आरोप केला. जिल्ह्यातील सात लाख ८५ हजार नुकसानग्रस्त शेतकरी विम्यापासून वंचित असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासन आणि पालकमंत्री संजय राठोड यांनी वाऱ्यावर सोडल्याचा आरोपही शिवसेना ठाकरे गटाने केला आहे.

**आठ लाख शेतकरी वंचित**

जिल्ह्यातील आठ लाख ४४ हजार शेतकऱ्यांनी ५०९ कोटींचा विमा हप्ता भरला होता . यावर्षी अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान झाले . त्यापोटी विमा कंपनीने शेतकऱ्यांना तीन हजार १७७ कोटी रूपये नुकसानभरपाई देणे गरजेचे आहे . प्रत्यक्षात ५९ हजार शेतकऱ्यांना ४१ कोटी १० लाख ६१ हजार ७८१ रूपयेच दिले . जवळपास आठ लाख शेतकरी विम्याच्या नुकसानभरपाईपासून वंचित आहे .



## महत्त्वाची बातमी

### राम मंदिराच्या पुजारी पदासाठी तीन हजार अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिराच्या पुजारी पदासाठी एक दोन नाही तीन हजार अर्ज आले. त्यापैकी २०० लोकांची निवड मुलाखतीसाठी झाली आहे. त्यांना विचारले जाणारे प्रश्न चर्चेत आहे. मकर संक्रांत झाल्यानंतर २२ जानेवारी २०२४ या दिवशी रामलल्ला मंदिरात विराजमान होणार आहेत. अयोध्येच्या राम मंदिर विश्वस्त मंडळाचे कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांनी सांगितले की, २०० जणांची निवड त्यांच्या योग्यतेच्या आधारे झाली आहे. आता त्यांची मुलाखत घेतली जाते आहे. या सगळ्यांच्या मुलाखतीचे केंद्र हे अयोध्येतील विश्व हिंदू परिषदेचं मुख्यालय असलेल्या कारसेवक पुरम आहे. अयोध्येतले दोन महंत मिथिलेश नंदिनी शरण आणि सत्यनारायण दास आणि वृंदावनचे जयकांत मिश्रा या तिघांचे पॅनल या सगळ्यांची मुलाखत घेते आहे. तीन हजार अर्जांमधून जे २०० अर्ज निवडले गेले आहेत त्यांच्या मुलाखती झाल्यानंतर त्यातले २० जण पुजारी म्हणून निवडले जाणार आहेत. गोविंद देवगिरी यांनी सांगितले की ज्यांची निवड होईल त्यापैकी २० जण पुजारी आणि इतर पदांवर कार्यरत असतील. तसेच या सगळ्यांना सहा महिन्यांचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. ते झाल्यानंतरच नियुक्ती केली जाणार आहे. प्रशिक्षणाच्या दरम्यान मोफत भोजन, राहण्याची मोफत व्यवस्था आणि दोन हजार रुपयांचा भत्ता दिला जाणार आहे.



**खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसुल मंडळमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत पुलाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. तालुक्यातील सावंगी -जैतखेडा रस्ता, वडगाव, शेखपूर फाटा, बाजारसावंगी -ताजनापूर शिरोडी रस्ता, सावंगी येथील धाड नदीवर, ताजनापूर शिरोडी चौफुलीवर पुलाच्या कामाला प्रत्यक्षरित्या सुरुवात करण्यात आली आहे.**

## अवैध धंद्यांना वेसण घालणारे दबंग एएसपी एम रमेश यांची गडचिरोली येथे बदली

आधुनिक केसरी न्यूज




**धाराशिव :** जिल्ह्याचे दबंग पोलिस अधिकारी अशी ओळख असलेल्या एम रमेश यांची बदली धाराशिव सहाय्यक पोलीस अधीक्षक पदावरुन गडचीरोली येथे अप्पर पोलिस अधीक्षक पदी बदली झाली आहे. महाराष्ट्रातील सर्वात जास्त 130 अवैद्य धंद्यावर तसेच अवैध व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकावर कारवाया करत जिल्ह्यात गुटखा विक्री करणाऱ्या आणि मटका जुगार चालवणाऱ्यांचा चांगलाच फास आवळला होता. पण सरकारी अधिकारी म्हटलं की बदली नियुक्तीचा खेळ पाठशिवणीला कायमचा ठरलेलाच असतो. त्यातच मिळालेल्या सेवेच्या कालावधीत त्या भागात केलेले काम, राबविलेली अनेक स्टिंग ऑपरेशन त्या सोबतच सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या सहकाऱ्यांना दिलेली वागणूक यांसारख्या बऱ्याच गोष्टी तुमची ओळख निर्माण करून देतात. एम रमेश यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षकांचा कार्यभार पाहताना सर्वसामान्यांशी संपर्क वाढविण्याबरोबरच जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यामुळे नागरिकांबरोबरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यात ते लोकप्रिय झाले होते. त्यांच्या झालेल्या बदलीमुळे कही खुशी कही गम असे वातावरण धाराशिव जिल्ह्यात निर्माण झाले आहे.

## जायकवाडीत पाणी सोडणार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मराठवाडा पाणीप्रकरणी सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. उत्तर महाराष्ट्राच्या धरणातून जायकवाडीला पाणी सोडले जाणार आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय सुप्रीम कोर्टाकडून कायम ठेवला आहे. उत्तर महाराष्ट्राच्या धरणातून आता जायकवाडी धरणात 8.5 टीएमसी पाणी सोडले जाणार आहे. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा कारखाना, संजीवनी कारखाना आणि शंकरराव काळे कारखाना या तिघांनी न्यायालयात याचिका दाखल करत जायकवाडीला पाणी देण्याच्या विरोधात भूमिका घेतली होती. काळे, कोल्हे आणि विखे पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेल्या याचिकेवर एकत्रित सुनावणी मंगळवारी पार पडली. वकील योगेश अहिराव आणि वकील युवराज काकडे म्हणाले, नगर जिल्ह्यातील कारखानदारांनी मराठवाड्याला पाणी सोडण्यास विरोध होता. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. पुढील सुनावणी 12 डिसेंबर ला पार पडणार आहे. राज्य सरकार पाणी सोडू शकते. नगर आणि नाशिक कारखानदारांनी पाणी सोडू नये असे नगर जिल्ह्यातील कारखानदारांचे म्हणणे होते.

2005 च्या समन्यायी पाणी वाटप कायद्यानुसार जायकवाडी धरणाच्या जलसाठ्याचा विचार करून नगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणांमधून पाणी सोडण्याचा कायदा संमत झाला होता. मात्र आता या कायद्यालाच विरोध होत असून या कायद्याचा फेरविचार व्हावा, अशी मागणी नगर आणि नाशिक जिल्ह्यातून होत आहे. यावर्षी पावसाळ्यात नगर जिल्ह्यात एकूण 410 मिमी पाऊस झालाय त्यात धरण पणलोटन क्षेत्रात पाऊस जास्त तर लाभक्षेत्रात कमी अशी परिस्थिती आहे. आज जिल्ह्यातील 12 तालुक्यातील 96 महसूल मंडळात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून नोव्हेंबर महिन्यात आज मितीला संगमनेरमध्ये एक तर पाथर्डी तालुक्यात आठ ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे.



**नगरसह नाशिक जिल्ह्यातील शेती धोक्यात येण्याची शक्यता**

अहमदनगर जिल्हा हा क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा असून मुळा, भंडारदरा व निळवंडे या तीन मुख्य धरणावर शेती व पिण्याच्या पाण्याच नियोजन आहे . मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात 100 टक्के असणाऱ्या या तिन्ही धरणात कमी जलसाठा असून आगामी वर्षभर नियोजन करणे मोठं आव्हान असताना जयकवडीला पाणी सोडले तर नगरसह नाशिक जिल्ह्यातील शेती धोक्यात येण्याची शक्यता आहे .




# पणवतीमुळे हरलो

आधुनिक केसरी

विश्वचषक २०२३ चा अंतिम सामना नुकताच अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअम येथे झाला. भव्य स्टेडिअमवर झालेल्या या सामन्याकडे अवघ्या जगाचे लक्ष होते. भारतातील सर्व क्रिकेटमंडळी रविवारी भारतीय संघ जिंकेल या आशेवर होते. परंतु, ऐनवेळेला भारतीय संघ कमकुवत पडला आणि ऑस्ट्रेलियाने बाजी मारली. यावेळी अनेक दिग्गज नेते, सेलिब्रिटीमंडळी स्टेडिअमवर हा सामना याची देही याची डोळा पाहण्यासाठी उपस्थित होते. यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी टीका केली आहे. आपली मुले चांगल्या पद्धतीने वर्ल्ड कप जिंकले असते. पण तिथं पणवतीने हरवून टाकले (पणवतीमुळे आपण हरलो), असे राहुल गांधी म्हणाले. यावेळी राहुल गांधींनी थेट कोणाचंही नाव घेतलं नाही. परंतु, त्यांच्या या वाक्याने जनसमुदायातून हर्षोल्लासाचा आवाज आला. टीव्हीवाले हे नाही सांगणार की (कोण पणवती), पण जनतेला माहितेय, असेही ते पुढे म्हणाले. काँग्रेसने यासंदर्भातील व्हिडीओ एक्सवर शेअर केला आहे. दरम्यान, विश्वचषक २०२३ मध्ये भारताची कामगिरी चांगली राहिली. अटीतटीच्या ठरलेल्या अनेक सामन्यांत भारताने डाव साधला. त्यामुळे अंतिम सामनाही आपल्याच पदरात पडेल, अशी सर्वांची अपेक्षा होती. याकरता सर्व स्तरातून भारतीय खेळाडूंसाठी शुभेच्छा आल्या होत्या. इतकेच नव्हे तर उपास-तापास, होम-हवनही करण्यात आले होते. हा क्षण स्टेडिअमवर जाऊन पाहण्याकरता अनेकांनी नरेंद्र मोदी स्टेडिअमवर गर्दी केली होती. यामध्ये अनेक राज्यातील नेते, मंत्री, केंद्रीय मंत्र्यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानसह रणबीर कपूर वगैरे मंडळी हजर होती. परंतु, ऐनवेळी समस्त भारतीयांचे स्वप्न धुळीस मिळाले.

# सरकार तुपाशी ! प्राध्यापक उपाशी !

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील उच्चशिक्षित नेट ,सेट ,पी.एच.डी.धारक विभाग भर दिवाळीमध्ये उपाशीच आहे. सरकारच्या निष्काळजीपणामुळे अनेक प्राध्यापकावरती उपासमारीची वेळ येत आहे .भर दिवाळीमध्ये सुद्धा प्राध्यापक वर्गांचे मानधन झालेले नाही. सी.एच.बी. प्राध्यापकांना तुटपुंजा वेतनावर काम करावं लागतं. आणि तेही मानधन वेळेवर मिळत नाही. साधारणपणे विचार केला असता, खाजगी क्षेत्रातील कोणत्याही कंपन्यांमध्ये काम करणारे कामगार वर्ग यांना पगारासहित दिवाळी बोनस दिला जातो.**

परंतु प्राध्यापकांना बोनस तर, सोडाच प्रत्यक्षात त्यांचे मानधन सुद्धा दिले जात नाही. इतक्या कठोर भूमिकेचे हे सरकार सी.एच.बी प्राध्यापकांना न्याय देऊ शकत नाही. खरे पाहिला गेले तर भारतीय राज्यघटनेतील कलम 12 ते 35 या कलमानुसार मूलभूत हक्क म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, यासारख्या मूलभूत गरजा देखील प्राध्यापक वर्ग पूर्ण करू शकत नाही. मग खऱ्या अर्थाने प्रश्न निर्माण होतो की, भारतीय संविधानातील कलम 32 नुसार सर्वोच्च न्यायालयांमध्ये याचिका दाखल करण्यासारखा हा प्रश्न आहे. कारण मूलभूत हक्कावरती गदा येत असेल तर या ठिकाणी आपल्याला अशा पद्धतीची भूमिका घेणे महत्त्वाच आहे. सी.एच. बी प्राध्यापक वर्ग जर आपला उदरनिर्वाह भागवू शकत नाही. तर मग या सरकारच्या धोरणाचा विचार आपल्या सर्वांना करणे गरजेचे आहे. दिवाळीमध्ये दिवाळी साजरी करणे सोडून दिवाळीमध्ये शिमगा साजरा करण्याची वेळ सर्व सी.एच. बी. प्राध्यापकावरती येत आहे .तरी देखील सरकार कुठल्याही पद्धतीची भूमिका सी.एच. बी प्राध्यापकांच्या बद्दल घेत नाही. या सरकारच्या दुटप्पीपणाच्या धोरणाचा निषेध करणे गरजेचे आहे. भर दिवाळीमध्ये स्वतः सरकार तूपाशी व प्राध्यापक वर्ग उपाशी आहे. मग अशा पद्धतीने सरकार सी.एच.बी प्राध्यापकावरती वेळ आणत असेल, आणि हिंदू धर्मातील सर्वात मोठा सण दिवाळी साजरी करण्यासाठी सुद्धा सरकारच्या वतीने चार -चार पाच पाच महिने प्राध्यापकांचे बिल त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होत नसेल, तर मग हे सरकार खऱ्या अर्थाने उच्चशिक्षित तरुण वर्गाची आर्थिक पिळवणूक करत आहे. सर्वात लाजिरवाणी गोष्ट आहे. आम्ही भीक मागत नाहीत हक्क मागतो.

आम्ही हक्क विरोधी नाही कर्त्यव्य निष्ट आहोत. दिवाळीत शिमगा साजरा करायची वेळ प्राध्यापक वर्गावर येतं आहे.व्यवस्थेच्या नावाने बोंब.. मारायची वेळ येत आहे.

आज जर आपण पाहिले तर साधारणपणे विचार केला असता शिक्षण क्षेत्रातील जर प्राध्यापक सुरक्षित नसतील तर विद्यार्थ्यांच काय होत असेल याची जाणीव सरकारला झाली पाहिजे ,भारतीय संविधानातील कलम 16 संधीची समानता या हक्काचे उल्लंघन होताना सर्वत्र दिसत आहे, म्हंजेच " समान काम समान वेतन"तसेच तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्याकांची बाजू जर विचारता घेतली तर अतिरिक्त कामाचा भार आणि मोबदला मात्र कमी प्रमाणात दिला जातो. भारतीय संविधानातील मुलभूत हक्क याचे देखील उल्लंघन होत आहे ते म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा,शिक्षण, आरोग्य ,या मूलभूत हक्कावर जर गदा येत आहे, कारण म्हणजे महिनाकाठी मानधन न देता आम्ही आमच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी सुद्धा सक्षम नाही आहोत, इतकी वाईट परिस्तिथी CHB प्राध्याकांवर येतं आहे. सर्वसाधारण



पणे विचार केला तर CHB प्राध्यापक ज्या ठिकाणी नोकरी करतात ,ते त्या ठिकाणचे रहिवाशी नसतात ,त्यांना महिण्याचं रूम भाडे ,महिण्याचा मेसचा खर्च असतो. तसेच स्वतःच्या दैनंदिन जीवनातील मूलभूत गरजा 9 महिने किंवा 6 महिने कोणतेही मानधन न घेता कशा भागवत असतील याचा सरकाने विचार करावा , आमदार, खासदार, मंत्री, या सगळ्यांना महिनाकाठी वेतन दिले जाते, आणि प्राध्यापकांच मानधन वर्ष वर्ष दिले जात नाही. याचाच अर्थ आमच्या मूलभूत गरजा आम्ही भागवू शकत नाही .म्हणजे आमच्या मूलभूत हक्कावर गदा येते, मग खरच प्रश्न पडतो की, लोकांनी लोकांसाठी लोकांच्या हितासाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही असे म्हणने योग्य आहे का, खरच हे शासन लोकांचे हित पाहत असेल तर यांना काळजीवाहक सरकार म्हणावे की निष्काळजी सरकार म्हणावे ही सगळ्यात मोठी शोकांतिका आहे, मी मारल्या सारख करतो तू रडल्यासारख कर, अशी अवस्था आजच्या सरकारची आहे, लोकमान्य टिळकांनी सुध्दा सांगितले आहे की, हक्क मागून मिळत नसतात ते हिसकावून घ्यावे लागतात. अशीच वेळ प्राध्यापकांवर आली आहे.पण , म्हणजे सरकार ला कमीत कमी जाग येईल, झोपलेल्या माणसाना जाग करता येत पण झोपेचं सोंग घेणाऱ्या या सरकारला जाग करण्यासाठी एकदा सगळे एकत्र येऊन कानउघाडणी केली पाहिजे. एकीकडे असे म्हंटले जाते की,

शिक्षण हे वाघीनीच दूध आहे, ही म्हण कुठेतरी नाहीशी झाली आहे ,शिक्षण हे शेळीच दूध आहे ,असे म्हणून गुरगुर्याच्या एव्हजी शांत बसायची वेळ आली आहे, जिथ पहावं तिथे सी. एच. बी. एकीकडून सरकार पिळवणूक करते दुसरीकडे संस्था , महिन्याच्या अखेरीस मिळणारी पगार एकदम वर्षाला मिळते , आणि त्यात ही वाटा मागितला जातो, का तर आम्ही तुम्हाला आमच्या संस्थेत CHB वर ठेवले आहे, एकदा तरी GD ऑफिस मधील अधिकाऱ्यांनी कॉलेजमध्ये येऊन पाहणी करावी की प्रत्यक्षात आमच्याकडून कॉलेज मध्ये CHB चे बिल जाते किती. आणि कॉलेजमध्ये असणाऱ्या CHB प्राध्यापकांना मिळते किती? याच्याशी काही घेणे देणे नाही पडले. सरकार बिनबुडाच आहे असे वाटत आहे पालथ्या घागरीवर पाणी , आज मरा उदया पाय धरा अशी अवस्था CHB प्राध्यापकांची झाली आहे , आग लागो त्या राजकारणाला राज करण्यासाठी केलेलं राजकारण आहे हे समाजकारण तर 0% पण नाही शून्याला तरी किंमत असते , पण ते कुठल्याच गटात बसत नाहीत, 1 लाख वेतनाचा माणूस 27000 हजार रुपयांच्या पगारात काम करतो आहे , तो पण 9 महिण्याच्या बेस वर , जॉइनिंग लेटर 9 महिन्याचे देयचे मग 1 वर्षांचे तर कशाला देयचे , 9 महिने आई जसे आपल्या मुलाला पोटात ठेवते , तसे CHB चे आहे, खूप काळजी घ्यावी लागते , नाहीतर बाळाला इजा होते , तसेच CHB चे आहे ओरडून जमत नाही , ना धावपळ करून जमत नाही, शांत बसावं लागत , जर ओरडले तर अपवादात्मक काही संस्थेतून काढून टाकण्याचा प्रकार सर्रास अनेक सी.एच. बी. प्राध्यापक वर्गावर हि वेळ येत आहे.

,शिका ,संघटीत व्हा ,आणि संघर्ष करा, आम्ही शिकलो ,संघटित झालो पण संघर्ष काय थांबला नाही, मरेपर्यंत संघर्ष वाट्याला येतो आहे. या व्यवस्थेला प्राध्यापक वर्गाच्या अडी -अडचणी सोडवणे आवश्यक आहे. सरकारने सर्व पात्रता धारक प्राध्यापक वर्गाची आर्थिक, मानसिक, पिळवणूक थांबवावी. व लवकरात लवकर प्राध्यापक वर्गाचा प्रश्न मार्गी लावावा. मार्गी लावत असताना मध्यप्रदेश सरकारने घेतलेला निर्णय फिक्स पेमेंट म्हणजेच ५० हजार महिना डीबीटी प्रणालीद्वारे प्राध्यापकाच्या खात्यात जमा करावा. व रखडलेली १००% प्राध्यापक भरती अधिक गतिमान करावी अशी नव्याने निर्माण केलेल्या हजारो प्राध्याकांनी नेट, सेट, पी.एच.डी. धारक संघर्ष संमितीच्या बैठकी दरम्यान कळवले. आहे. तरी सरकारने या मुद्याकडे गांभीर्याने लक्ष देणे काळाची गरज आहे.

प्रा. बालाजी हरिभाऊ मगर
इतिहास विभाग, मो.नं.9322988793



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# इतरांच्या मतांचा त्रास करून घेण्यासाठी आपलं जीवन नसतं

आधुनिक केसरी

**इतरांच्या मतांचा त्रास करून घेऊन सारखं चिंतन करत बसण्यासाठी आपलं जीवन नाही ज्यांच्या कडे जे आहे ते त्यांच्या कडुन मिळत असतं आपण काय स्वीकारलं पाहिजे हे आपल्यावर बंधन नसल्याने चांगलं घ्या वाईट दुर्लक्षित करा राजहंसा सारख दुध पाणी वेगळं करायला शिका व्यर्थ चिंतन चिंता करून जीवनातील वेळ आणि काळ घालवून आपलं अहित करणं आवश्यक नाही. आपलं जीवन घडविण्यासाठी आपलं आयुष्य असतं पण आयुष्यातील बहुतांश वेळ आपण इतरांच्या मतांचा अथवा बोलण्याच परिणाम आपल्यावर करून घेतो. इतरांच्या मताचा अथवा बोलणयाचा आपल्यावर आपण इतका जास्त परिणाम करुन घेतो एक प्रकारे आपण आपल्या स्वतःच्या पायावरच दगड पाडून घेतो.**

इतरांची मतं हि त्यांच्या सामर्थ्य नुसार असतात मग त्या विषयावरून आपण स्वतःला दुःखी कारण उचित ठरणार नाही. इतरांच्या मताचा परिणाम होऊ देयचा नसेल तर आपला विवेक हा सदैव जागृत असला पाहिजे.दैनंदिन जीवनात अनेक लोकांशी आपला संपर्क येतच असतो. त्याच बरोबर संवाद पण होतोच असतो. संवादातील अनेक शब्द वाक्य हि आपल्या डोक्यातून बाहेर काढता येतं नाहीत. हिच स्थिती आपली स्थिरता बिघडविण्यासाठी कारणीभूत ठरते.महणून आपण सदैव सचेत असलं पाहिजे बोलणारा हा त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार बोलत असतो आपण ते स्वीकारलं पाहिजे असं आपल्यावर बंधनं नसतं मग त्याच बोलण आपण स्वीकारण्याच काही करणं नाही.आपला विवेक जागृत असला पाहिजे.जेणेकरून आपण डिस्टर्ब होणार नाहीत.जीवनातील तणावाचं मुख्य कारण इतरांकडून आपल्या संदर्भात झालेलं वक्तव्य अथवा मत आपण एवढं मनावर घेतो कि आपण दुसर्याच्या मतांबद्दल स्वतःला त्रास करून घेतो हा तणाव आपलं मानसिक शारिरीक वैचारिक नुकसान करतो. कधी कधी हा तणाव टोकाला जाऊन आपलं प्रचंड नुकसान करतो. आपण फक्त पाहत राहतो व नुकसान होऊ देतो. मुळात आपण हे नुकसान होऊ देता कामा नये. दैनंदिन जीवनात आपला कळतं न कळत कित्येकांशी प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष रित्या संपर्क येणारच अनेक कार्य पार पाडण हे जीवन क्रमाचा भाग असल्याने संबंध येणार नाही असं होण शक्य नाही. याच दरम्यान बोलण्यातून अथवा व्यवहारातुन अनेकदा सहज अथवा जाणिव पुर्वक अशा कारणांमुळे काही शब्दांची देवाण



घेवाण होते.ज्याची आपण कल्पनाच करू शकत नाही. साध्याची सामाजिक संस्कृती दिवसेंदिवस बिघडत आहे.आपण स्वतः ला वजा करून इतरा बदल मत नोंदविण्याची पद्धत बदलत चालली आहे.इतरांशी बोलताना सामाजिक सौजन्य संपुष्टात येत चालले आहे.अस होत असताना त्याचे परिणाम आपल्या स्वस्थावर होत आहेत. आरेला कारे म्हणत कोण किती टोकाच बोलु शकतो हि जणुकाही स्पर्धा लागली आहे. संयम हा अद्भुत गुण फार फार दुर्मिळ झाला आहे. सामाजिक संस्कृती हि वैचारिक दिवाळखोरी कडे मार्गक्रमण करत आहे. असंच काहीसं सचित्र निर्माण झालं आहे. देणारा हा आपल्याला कुवतीनुसार फुल, काटे, दगड, शिव्या शाप दुषण, विचार अविचार, जे काही त्याच्या मध्ये ठासुन भरलेल आहे ते सद्सद्विवेक बुद्धी नुसार देत असतो. देणे हा त्याचा धर्म आहे पण घेणे हा आपला धर्म नाही .आपण ते स्वीकारलंच पाहिजे असं काही आपल्यावर बंधनं नाही मग आपण कशासाठी त्यावर उतावीळ असतो. आपल्याला इतरांकडून जे काही मिळालं ते स्वीकारताना आपला विवेक जागृत असला पाहिजे तो जागृत असेल तर मग इतरांकडून आपणांस चांगलं वाईट काहि हि मिळालं तरी त्यातील योग्य तेच आपण स्वीकारणार एवढं मात्र निश्चित. देणारा आपल्याला स्वीकारण्याच बंधनं घालू शकत नाही हिच आपल्या विवेकाची ताकद आहे.हि ताकद जोपासली तर इतरांच्या मतांचा प्रभाव आपल्यावर निर्माण होत नाही.आपला विवेक सदैव सचेत आणि जागृत ठेवण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान हाच एकमेव पर्याय आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * ( * According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ॲड. नकुल देशमुख यांच्या संकल्पनेतून 'जयअनंत'चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील भाजपाचे युवा नेते ऍड नकुल देशमुख यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या व उत्सव महाराष्ट्रीयन संस्कृतीचा २०२३ या उपक्रमअंतर्गत जयअनंत या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२२ पासून सतत तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन, नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने कला सादरीकरण आणि विशेष म्हणजे खवय्या मंडळीसाठी खाद्यपदार्थ आकर्षण आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात रिसोड मालेगाव तालुक्यातील जनतेने जास्तीत जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रिसोड तालुक्यातील भाजपाचे ॲड.नकुल देशमुख यांच्या संकल्पेतून साकार झालेला.जयअनंत महोत्सव २०२३ वर्ष ३ रे,भारत माध्यमिक शाळा,रिसोड येथे असणार आहे. उत्सव महाराष्ट्रीयन संस्कृतीचा अंतर्गत या महोत्सवाच्या आकर्षण असणार आहे.



ॲड.नकुल देशमुख यांच्या संकल्पनेतून साकार झालेला जय अनंत महोत्सव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी भारत माध्यमिक शाळा रिसोड च्या भव्य प्रांगणात जय अनंत महोत्सव आयोजित केला आहे. याही वर्षी दिनांक २२,२३,२४ नोव्हेंबर रोजी वर्ष तिसरे या महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले आहे. उत्सव महाराष्ट्रीयन संस्कृतीचा यामध्ये महाराष्ट्राचे सांस्कृतिक ओळख असलेले देखावे, छत्रपती, शिवकालीन, शहारे आणणाऱ्या घटनांचा देखावा. वारकरी संप्रदायाची माहिती. शिवकालीन शस्त्र प्रदर्शनी व माहिती. विविध संत परंपरा. अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ, सुंदर वस्तू विक्रीसाठी स्टॉल या महोत्सवात उपलब्ध असणार आहेत. मागील दोन वर्षाच्या जनतेच्या मोठ्या प्रतिसादानंतर यावर्षी आगळावेगळा व विविध नवीन देखावे. संत परंपरा, संप्रदाय, विविध नृत्य प्रकार या आकर्षणाच्या बाबी जयंत महोत्सवात यावर्षी असणार आहेत. कार्यक्रम पारिवारिक स्वरूपाचा असल्यामुळे विभागातील जनतेला आपल्या परिवारासहित सदर कार्यक्रमास येऊन आनंद घेता येणार आहे. आपल्या भागातील आपल्या परिसरातील जनतेला काहीतरी नवीन आणि आनंददायी क्षण तसेच आपली संस्कृती इतिहास आपली संत परंपरा याबद्दल देखाव्याच्या माध्यमातून जनतेपुढे मांडण्याचा हा एक अतिशय सुंदर आणि कौतुकास्पद प्रयत्न ॲड.नकुल देशमुख यांच्या संकल्पनेतून साकार झालेला आहे. मागील वर्षी अतिशय सुंदर व मनमोहक मांडणी जया अनंत महोत्सव अंतर्गत करण्यात आली होती. लोकांनी मोठ्या प्रमाणात हजारोच्या संख्येने भेट देत प्रतिसाद दिला होता. आणि तेवढेच कौतुक सुद्धा केले होते. यावर्षी त्याच पद्धतीने जय अनंत महोत्सव असणार आहे. दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सदर कार्यक्रमाचे उदघाटन पार पडणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री अनंतरावजी देशमुख राहणार आहेत.तर चिखलीचे आमदार श्वेताताई महाले पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. व विशेष उपस्थिती म्हणून ॲड.नकुल देशमुख यांची उपस्थित राहणार आहेत.

**स्थानिक बचत गट, समूह, व्यावसायिक यांना स्टॉलसाठी प्राध्यान्य :** ॲड . नकुल देशमुख यांनी जय अनंत महोत्सव 2023 मध्ये विविध वस्तू विक्रीकरिता व खाद्यपदार्थ स्टॉलसाठी स्थानिक भागातील परिसरातील बचत गट, समूह व व्यवसायिकांना प्राधान्य दिले असून, विभागातील व परिसरातील बचत गट व समूह व व्यवसाय करणाऱ्यांनी मागच्या वर्षी प्रमाणे याही वर्षी उत्स्फूर्त अशी नोंदणी करत यामध्ये सहभाग नोंदवला आहे . स्थानिक बचत गट समूहांना प्राधान्य देऊन त्यांच्या उद्योग व्यवसायाला चालना मिळावी म्हणून नकुल दादांनी दिलेल्या प्राधान्याचे स्थानिक बचत गट समूहाकडून कौतुक होत आहे . यावर्षी 102 स्टॉल हे विविध वस्तू विक्री व खाद्यपदार्थ विक्री करता उपलब्ध असणार आहेत . परिवारासह या महोत्सवाचा आनंदी अनुभव घेण्याचे आवाहन जय अनंत महोत्सव समिती रिसोडने केले आहे .



# व्हाईस ऑफ मीडिया पत्रकारांच्या आयुष्यातील प्रकाश बीज : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**बारामती :** आतापर्यंत पत्रकारांच्या झालेल्या अधिवेशनाचे उपस्थितीतीचे उच्चांक या अधिवेशनाने मोडले आहेत. बदलत्या परिस्थितीत मिडियाचे स्वरुप देखील बदलले. चौथ्या स्तंभाची ताकद भरपूर आहे. पण दिलखुलास लिहिले गेले आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. लेखणीला मर्यादा आल्याचे जाणवते. कुणालाही झुकविण्याची ताकद व्हॉईस ऑफ मीडियात आहे. व्हाईस ऑफ मीडिया पत्रकारांच्या आयुष्यातील प्रकाश बीज असल्याचे गौरवोद्‌गार विधान सभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी काढले.

पत्रकारांच्या न्याय हक्काचं व्यासपीठ असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाचा राज्याचे शिखर अधिवेशनाचे शानदार उद्‌घाटन ग.दि.मा. सभागृहात भरगच्च उपस्थितीत पार पडले.

उद्‌घाटन सत्राला अध्यक्ष म्हणून विरोधी पक्षनेते विजय वड्डेट्टीवार लाभले.

तर सुनेत्रावहिनी अजितदादा पवार, हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील , ज्येष्ठ पत्रकार खा.कुमार केतकर, गोदावरी समुहाच्या अध्यक्षा राजश्रीताई पाटील, ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे, महेंद्र पिसाळ, व्हाईस ऑफ मीडिया राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, (उपाध्यक्ष मंदार फणसे, ) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, माजी आमदार रामराव वडकुते, राज्य उपाध्यक्ष तथा अधिवेशन संयोजक अजितदादा कुंकूलोळ, बारामतीचे अध्यक्ष जितेंद्र जाधव व महेंद्र पिसाळ यांचे देखील कार्यक्रमाला उपस्थिती होती....

यावेळी विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, "दर्पण म्हणजे जसाच्या तसा", पण आता स्वरूप बदलल आहे. असे असले तरी या क्षेत्राची ताकद कायम आहे. कॉर्पोरेट हे क्षेत्र होत असल्याने बंधन वाढत आहेत. दिलखुलास लिहिता येत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे दर्पणकाराना अभिप्रेत आरश्यावर डाग मात्र तेवढे वाढले आहेत. सुनेत्राताई येथे अधिवेशनाला आल्या. त्यामुळे अजित दादा पर्यंत पत्रकारांचा व्यथा, वेदना, मागण्या पोचतील. पत्रकारांची व्यथा मोठी आहे. सूत्रांच्या अर्थाने होणारी सोयी ची पत्रकारिता बदलली पाहिजे. लोकशाही टिकवण्यासाठी पत्रकारिता मजबूत असली पाहिजे. निकोप लोकशाहीसाठी खरी पत्रकारिता व्हावी. लोकमान्य टिळकांच्या त्या काळच्या अग्रलेखा चा हवाला देत सरकारच डोकं ठिकाणावर आहे का हे विचारण्याचा धाडस देखील आता जगल पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. संध्याकाळी पाच वाजता सुद्धा मंत्रालय समोर उभी असलेली सामान्यांची मोठी रांग पहिली की खंत वाटते. तेव्हा प्रश्न संपले की वाढले याचा विचार होणे गरजेचे आहे. तेव्हा पत्रकारांनी सामान्यांच्या व्यथा वेचून मांडाव्यात असेही वडेट्टीवार म्हणाले.

यावेळी सुनेत्रावहिनी पवार यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपुख्यमंत्री अजितदादा उपस्थित राहू शकले नसल्याची माहिती दिली. दरम्यान अजितदादा यांचा शुभेच्छासह अपेक्षावजा संदेश त्यांनी वाचून दाखवला. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा.

देत बारामती निवड केल्याबद्दल धन्यवाद दिले. विकासाचे मॉडेलची पाहणी करावी. चौथा स्तंभ म्हणून बारामतीची पाहणी करावी, दुरुस्ती सुचवावी.

# कुपोषण लवकरच संपवणार : राज्यपाल बैस

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार विविध विकास कामे सुरु आहेत. १५ नोव्हेंबरला जनजाती गौरव दिवस हा आदिवासी नागरिकांनी संस्कृती आणि पर्यावरण राखण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. सन २०४६ पर्यंत विकसित भारत संकल्प पूर्ण करण्यासाठी जनजाती बांधवांमध्ये परिवर्तन होऊन सर्वांपर्यंत शासनाच्या सर्व योजना नक्कीच पोहोचतील. येत्या पाच वर्षांत इगतपुरी तालुक्यातील कुपोषण संपवण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असुन त्या बाबतच्या सर्व सुचना प्रशासनाला दिल्या आहेत. लवकरच २ लाख ५५ ग्रामपंचायती विकसित होतील. राज्य आणि केंद्र सरकारकडून नागरिकांना सशक्त करण्याचे काम सुरु आहे. वीज, पाणी, पोषण, अन्न सुरक्षा आदी कल्याणकारी योजनाचा लाभ देण्याचे लक्ष आहे यासाठी ही यात्रा आपल्यापर्यंत आली आहे. नाशिक हा गोल्डन ट्रँगल असून ह्या भागातील कुपोषणमुक्ती करणे गरजेचे आहे. कुपोषण पीडित नागरिकांसाठी आपण सर्वांनी पुढाकार घेऊन कौशल्य विकास साधण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत. विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे प्रत्येकाचे कौशल्य निपुणता अत्यावश्यक आहे. समृद्ध महाराष्ट्र बनवण्याचा संकल्प करून आपण पावले उचलून यात्रा यशस्वी करण्यासाठी शुभेच्छा देतो असे प्रतिपादन राज्याचे राज्यपाल महामहीम रमेश बैस यांनी केले. नाशिक जिल्ह्यात प्रभू श्रीराम यांचे पावन वास्तव्य, सप्तश्रुंगी देवी याबद्धल राज्यपालांनी उल्लेख करून नाशिक जिल्ह्याचे विशेष महत्व असल्याचे सांगितले. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नाशिक जिल्ह्यात दुसऱ्यांदा राज्यपाल यांचा पदस्पर्श झाल्याने भाग्य उजळले आहे. हा तालुका आदिवासी असून शेतीबहुल भाग आहे. मात्र उत्पादित झालेल्या शेतमालाला बाजारपेठ मिळणे आवश्यक आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या उत्पादनाला मॉलच्या धर्तीवर संधी द्यायला हवी.




महाराष्ट्र Business Katta












# आयुध कविता एक चिंतन

आधुनिक केसरी

**कवी यशवंत पुलाटे हे अतिशय संवेदनशील मनाचे कवी आहे. आज स्वतःच्या पायाने त्यांना चालता येत नसले तरी अर्थपूर्ण कवितेच्या माध्यमातून त्यांनी अनेक कवींना कवितेच्या प्रवासातून मागे टाकले आहे. कवी कुसुमाग्रज यांचे ते आवडते शिष्य आहेत. आज त्यांच्या कवितेच्या धूनने प्रवरा कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून दररोजची अहमदनगर जिल्ह्याची सकाळ उगवते. त्यांची आयुध नावाची कविता वाचण्यात आली अन् शेती आणि शेतकरी व शेतकऱ्यांची लक्ष्मी यांचे यथार्थ चित्र त्यांनी माझ्या डोळ्यासमोर उभे केले. व या कवीतेवर रसग्रहण करण्याचा मला मोह झाला. आपल्या कवितेच्या पहिल्या 2 ओळीत ते म्हणतात.**

**रानी सुगीचा नासवा**
**पिक पाखरा फसवा**
**नांदलेली ओली मेंदी**
**थोडी माहेरी पाठवा**

शेतकरी मन लावून पेरणी करतो. निसर्ग ही त्याला चांगली साथ देतो. पीक डोलारून भुईवर येते. आता ते पोटऱ्यात येते . कणसात दाणे भरायला सुरुवात होते. साऱ्या पक्षाला सांगावा जातो की यंदाची सुगी चांगली बहरली आहे. ते ही इतर पक्ष्यांना सांगावा सांकेतिक भाषेत देतात की आमच्या परिसरात पिक चांगली बहरलीत. तुम्ही ही या. आपण सगळे मिळून या वर्षी तृप्तीचा ढेकर देवू. तर शेतकरी ही मनात इमले बांधतो. या वर्षी सुगी चांगली होते आहे. लेकीच लग्न करू. मुले , पाहुणे रावळे, घरधनीनीला चांगले कपडे, साड्या घेवू. लग्न या पिकावर केल्यावर पाहुण्यांना विनंती करू की नांदायला गेलेल्या नव्या नवरीला थोडे दिवस माहेरी पाठवा. तीला चांगल गोडधोड करू. चांगल माहेरपण करू. अशा स्वप्नांचे इमले तो दररोज घरात चर्चा करत बांधत असतो, रचत असतो. आणि अशातच अवकाळी पावसाला सुरूवात होते आणि होत्याचे नव्हते होते. बळीराजाच्या सप्नाचा चुराडा होतो. पाखरांनी ही सर्वांना दिलेले निरोप फसवे होतात.

**किती रापली धुपली**
**रान रती ती थकली**
**वेळ भुकेची हिरवी**
**कळ देऊन पोसली**

कवी भूमातेबद्दल या ओळीत लिहितात की बळीराजाने पुढील पिकासाठी मशागतीच्या वेळी रान नांगरतांना ती वेदनेने थकून जात आहे.तसेच उन्हामुळे किती रापते आहे. उन्हाच्या झळयामुळे धूपली जात आहे. पण बीज पेरल्यानंतर मात्र हिरवा शालू नेसण्यासाठी ती स्वतः कळा देवून पिकांना पोषित असते.

**दर वेळच्या खेपेला**
**डाव पडतो रडीचा**
**किती वेळा वर्षातून**
**गर्भ उकलु मातीचा**

आपल्या कवितेच्या पुढच्या ओळीत बळीराजाच्या दैन्यावस्थेस कारणीभूत ठरणाऱ्या विविध प्रसंगाबद्दल बोलतांना कवी म्हणतात की बळीराजाच्या इतका सोशिक माणूस कुणी नाही. उत्पन्ना पेक्षा जास्तीत जास्त वेळा घाटा सोसणारा कोण असेल तर तो म्हणजे फक्त बळीराजाच आहे. कधी पावसाच्या कमतरतेमुळे, कधी अतिरिक्त पावसामुळे, कधी रोगराईमुळे , कधी वाईट हवामानामुळे जमिनीच्या बाहेर आलेली पिके उमलायच्या आतच नाईलाजाने माना टाकायला लागतात. पिकांची ही स्थिती पाहून जसे घरातील प्रिय व्यक्ती गेल्याची वेदना होते तशी ही वेदना बळीराजाची होते. आणि शेवटी कितीक दुःख करत बसणार म्हणून पुढच्या पिकासाठी मातीच्या गर्भातून उकलू पाहणाऱ्या अर्धमेल्या गर्भावर स्वतच्या हाताने दुःखी अंतकरणाने नांगर फिरवतो.

**साता दिसातून फेरा**
**बुरशी हटवण्या नवा**
**गेली पोताची ती रया**
**हर हंगामाला दवा**

आताच्या शेतीबद्दल भाष्य करतांना कवी म्हणतो आता शेती करणे म्हणजे जुगार झाला आहे. कधी हवामान बदलेल रोगराई येईल हे सांगता येत नाही. या वाईट हवामानामुळे पिकावर सतत बुरशीजन्य आजाराचा धोका वाढतोय. इतका की आठवड्यातून एकदा तरी सर्व पिकाला येढा द्यावा लागतो. याचा परिणाम असा झाला आहे की मातीची उपजावू क्षमताच कमी कमी होत गेली आहे. एखादी कुपोषित बाई पाहिल्यावर जशी तिच्या अंगातली रया गेल्यासारखी दिसते तद्वतच अवस्था धरणीमातेची झाली आहे. एके काळी एक दाणा पेरला तर आधोलीभर उत्पादन होत होते तेच आज या रोगराईमुळे पसाभर होणे दुरापास्त झाले आहे. आज असा एक ही हंगाम नाही की पिकाला फवारणी करावी लागली नाही.

आयुध . . .

रानी सुगीचा नासवा
पिक पाखरा फसवा
नांदलेली ओली मेंदी
थोडी माहेरी पाठवा

किती रापली धुपली
रान रती ती थकली
वेळ भुकेची हिरवी
कळ देऊन पोसली

दर वेळच्या खेपेला
डाव पडतो रडीचा
किती वेळा वर्षातून
गर्भ उकलु मातीचा

साता दिसातून फेरा
बुरशी हटवण्या नवा
गेली पोताची ती रया
हर हंगामाला दवा

कूस मातीची निझूर
वांझ माऊलीची दाई
तिला नाही दयामाया
हिर्व्या लेकराची खाई

वय होण्याआधी बये
झाली कशी तु वांझुटीं
बाप भुकेचा रडतो
डोळा आसवांची दाटी

तुझा रानपाला तुला
हर खेप जडीबुट्टी
हिर्वा फ्राय् खाऊनिया
नको करु नट्टीपट्टी

पिढ्या पिढ्याची ही ठेव
तिला जपावे सावध
बळीराजा तुझ्या हाती
नाही दुसरे आयुध .

**कूस मातीची निझूर**
**वांझ माऊलीची दाई**
**तिला नाही दयामाया**
**हिर्व्या लेकराची खाई**

पुढच्या ही ओळीत कवी म्हणतो स्वतः ला शेती तज्ञ म्हणवणारे की ज्यांनी कधी शेती ही केली नाही. असे "वांझ माऊलींच्या दाई" उदाहरणार्थ दाई म्हणजे जिला स्वतः ला कळा घ्यावयाच्या नसतात पण ती बाळंतिणीला अशा कळा घे, तशा कळा घे असा सल्ला देत असतात. तशाच पद्धतीचा सल्ला हे कीटकनाशक वापरा, हे रासायनिक खते वापरा हा सल्ला आताचे आधुनिक शेतीतज्ञ देतात.आणि बळीराजा ही त्यांचा सल्ला ऐकतो. पण हे शेतीतज्ञ जागतिक भांडवलदारांच्या सल्ल्याने जास्तीत जास्त कमिशन मिळवण्यासाठी रासायनिक खते व कीटकनाशके वापरण्याचा सल्ला बळीराजा यांना देतात. यांच्या सल्ल्या घेतल्याने तात्पुरते उत्पन्न वाढते. मात्र हळूहळू मातीची कुस निझुर होत राहते. शेतीला मारलेल्या कीटकनाशकाला काही दयामाया नसते. तणाबरोबर ते लहान लहान हिरव्या पिकांना ही मारून टाकते.

**वय होण्याआधी बये**
**झाली कशी तु वांझुटीं**
**बाप भुकेचा रडतो**
**डोळा आसवांची दाटी**

आता कवी धरणीमातेला उद्देशून म्हणतो हे माते या रासायनिक खते, तसेच आधुनिक बियाणामुळे पिकावरील विविध आजारांच्या साथीमुळे कीटकनाशके यांचा सतत वापर यामुळे पहिला परिणाम बळीराजावर सुध्धा होतो. त्यामध्ये मळमळ, चक्कर येणे , त्वचेवरील जळजळ, तीव्र डोकेदुखी व इतर ही अनेक लक्षणे सुरू होतात. कधी कधी बळीराजा यांच्या शरीरात हे कीटकनाशक अनावधानाने जावून मृत्यू ही ओढवतो. दुसरा परिणाम मातीतील सूक्ष्म अन्नघटक जे पिकांच्या वाढीसाठी , अधिक उत्पादनासाठी , प्रतिकारक्षमता वाढीसाठी उपयुक्त असतात ते यांच्या सततच्या वापरामुळे नष्ट होत आहे. त्यामुळे उत्पन्नाचे प्रमाण घटते आहे. काही ठिकाणी उत्पन्नच मिळत नाही. कवी याला हे धरणीमाता तू वय होण्याआधीच वांझोटी झाली आहेस. अशी उपमा देतात. व त्याचा परिणाम म्हणजे आज बिचारा बळीराजा भुकेने रडतो आहे. आसवांनी त्याच्या डोळ्यात दाटी केली आहे.

**तुझा रानपाला तुला**
**हर खेप जडीबुट्टी**
**हिर्वा फ्राय् खाऊनिया**
**नको करु नट्टीपट्टी**

येथे कवी बळीराजाच्या शब्दात म्हणतो. वनस्पतिजन्य कीटकनाशके किंवा नैसर्गिक कीटकनाशके ही सेंद्रिय आणि नैसर्गिक कीटकनाशके आहेत जी वनस्पती आणि खनिजांपासून बनविली जातात, ज्यात नैसर्गिकरित्या बचावात्मक गुणधर्म असतात . या प्रकारची कीटकनाशके वापरली गेली पाहिजे. कारण ते विघटित झाल्यामुळे विषारी पदार्थ सोडत नाही. उदा. शेताच्या बांधावर पूर्वी रुई वाऱ्याच्या बाजूने लावल्या जात. त्यातून आलेल्या वाऱ्याने पिकावरील माव्यासारखे रोग नष्ट होत असे. पुदिना या वनस्पतीच्या वाळलेल्या पानांची भुकटी भुंगेरे नियंत्रणासाठी वापरत.वनस्पतीजन्य औषधांमुळे मात्र मधमाशीवर चांगला परिणाम दिसून येतो, ही औषधे पर्यावरणपूरक असल्यामुळे जीवसृष्टीला याचा धोका नसतो व यामुळे या औषधाच्या फवारणीनंतर मधमाशी पिकांकडे आकर्षित होते परिणामी पिकांची फलधारणा वाढते. याबरोबरच शेवरी, एरंडी व इतरही अनेक बांधावरील वनस्पती ही रोगराई नष्ट करीत असते. पण आता शेतीचे विभाजन वाढल्याने कमी कमी जमीन वाट्याला येत असल्याने बांध ही कमी झाले आहेत. व बांधावरील ही किडीला, रोगांना पळवून लावणारी ही झाडी ही नष्ट होत चालली आहे. एव्हढे सगळे उपाय असतांना या कीटकनाशकांची मलमपट्टी करून स्वतःचा नट्टापट्टा नको आहे. अशा प्रकारची जनजागृती बळीराजामध्ये होत आहे.

**पिढ्या पिढ्याची ही ठेव**
**तिला जपावे सावध**
**बळीराजा तुझ्या हाती**
**नाही दुसरे आयुध.**

शेवटी कवी बळीराजाला म्हणतो की अनेक पिढ्यांपासून चालत आलेलं हे जैविक शेतीच तंत्रज्ञान वापर. त्याला जपून ठेव. वरील नैसर्गिक वनस्पती व खानिजापासून बनविलेले कीटकनाशक वापर. थोडे उत्पन्न कमी मिळेल. पण विषमुक्त अन्न तुम्हाला खायला मिळेल. तुम्ही आम्ही सर्व निरोगी आयुष्य जगू. बळीराजाच्या हाती आता हेच जैविक शेती नावाचा आयुध शिल्लक आहे त्याचाच वापर नियमितपणे व्हावा.

कवी यशवंत पुलाटे
अहमदनगर. मो. 9657867499.

# वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवणे चूकच !

आधुनिक केसरी

**ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने वर्ल्डकप - २०२३ चा अंतिम सामना जिंकला. मिळालेल्या वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवला आहे, हातात मद्याची बाटली असे छायाचित्र सर्वत्र वेगाने व्हायरल ( प्रसारित ) होत आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू मिशेल मार्श याचे ते छायाचित्र आहे. विजयाचा आनंद साजरा करण्याची ही पद्धत व्यक्तितील अहंकारीपणाचे जाहीर प्रदर्शन तर करतेच. पण एक माणूस म्हणूनही त्याची ही कृती निषेधार्ह आहे. याविषयी ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्ड, आंतरराष्ट्रीय क्रिकेट संस्था ( आयसीसी ) यांसह क्रिकेट खेळणाऱ्या सर्वच देशांच्या मंडळांनी त्या क्रिकेटपटूकडे खुलासा मागितला पाहिजे. त्या क्रिकेटपटूस घसघशीत दंड ठोठावत प्रदीर्घ कालावधीसाठी निलंबितही केले पाहिजे. त्याशिवाय केलेल्या चुकीचे गांभीर्य लक्षात येणार नाही.**

यशाने हुरळून जात गैरकृत्य करून प्रकरण अंगाशी आल्यावर माफी मागणे याला काही अर्थ नसतो. त्यामुळे कडक कारवाई टाळण्यासाठी माफी मागण्याची नौटंकी केली तरी कारवाई झालीच पाहिजे. शिवाय याचा ठिकठिकाणाहून निषेध झाला पाहिजे. अगदी ऑस्ट्रेलियातूनही. असे भ्याड कृत्य का केले ? याविषयी जाब विचारला तर कुठे पश्चाताप होईल. अन्यथा केले ते योग्य आहे असेच मानले जाईल. क्रिकेटपटूचे मैदानावरील वर्तन असभ्य असल्यास त्याच्यावर नियमानुसार कारवाई होते. या क्रिकेटपटूने तर चक्क वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवून स्वतःतील आगाऊपणा जगाला दाखवला आहे. अशांना खेळाडू तरी कसे म्हणावे ? की ज्यांना खेळत असलेल्या खेळाचा सन्मान राखता येत नाही. अंतिम सामना खेळण्यासाठी प्रत्येक संघ कसून प्रयत्न करतो. त्यात कोणी यशस्वी तर कोणी अयशस्वी होते. तो उद्दामपणा म्हणजे त्या समस्त क्रिकेट संघांचाही हा अपमान नव्हे का ? क्रिकेट हा सभ्य माणसांचा खेळ मानला जातो. मात्र खरच तस आहे का ? की केवळ बोलण्यापुरताच सभ्य माणसांचा खेळ असे त्याला समजायचे ? म्हणजे बोलाची कढी आणि बोलाचा भात तसे. मार्क आणि स्टीव्ह वॉ, ॲडम गिलख्रिस्ट असे उत्तम खेळ आणि चांगले गुण असलेले खेळाडू ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघात होते. आपण जो खेळ खेळतो त्याचा आदर करणे म्हणजे काय ? हे त्यांच्या विनम्र वागणुकीतून मैदानात आणि मैदानाबाहेरही दिसत असे. सचिन तेंडुलकर, वेस्ट इंडिजचा ब्रायन लारा असे दिग्गज खेळाडू क्रिकेटला लाभले. मात्र त्यांच्याकडून कधीही मार्शप्रमाणे कृत्य घडले नाही. यामुळेच त्यांचे नाव आजही आदर्श खेळाडू म्हणून क्रिकेट विश्वात प्रसिद्ध आहे. येथे तर सांघिक प्रयत्न केल्याने मिळालेल्या यशाने हुरळून जाणे झाले आहे. मग केवळ एकट्याने मेहनत घेत यश संपादन केल्यावर त्या खेळाडूने काय केले असते ? याचा विचार केलेला बरा. 'छोट्या खेळाडूचे निलाजरे कृत्य' असे त्या कृत्याविषयी म्हणता येईल. आतापर्यंत कैक क्रिकेटचे सामने झाले. मात्र असे कृत्य प्रथमच निदर्शनास आले. कारण मार्श प्रमाणे उन्मादी क्रिकेटपटू तेव्हा नव्हते. असे बोलता येईल. 'अतिथी देवो भव' ही भारतीय संस्कृती, सभ्यता आहे. त्यानुसार येथे पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागतही होते. यासाठी भारत जगात प्रसिद्ध आहे. मात्र ज्याला येथील संस्कृती, सभ्यता यांविषयी




जिज्ञासा आहे. त्यालाच त्याविषयी अधिकाधिक जाणून घ्यावे आणि तसे वागावे असे वाटते. मग तो भारतीय असो वा भारताच्या बाहेरील असो. असे सांगण्याचे कारण की, वर्ल्ड कप - २०२३ च्या निमित्ताने मार्श याचे गेल्या काही कालावधीपासून भारतात वास्तव्य आहे. मात्र तरीही त्याची पाटी कोरी ती कोरीच आहे. गाढवाला गुळाची चव काय हे वाक्य त्याने सत्यात उतरवून दाखवले. क्रिकेट अथवा अन्य कोणताही खेळ असो त्या खेळांव्यतिरिक्तही एक मोठे विश्व असते त्याचे माणुसकी असे नाव आहे. जो माणूस उन्मादीपणाचे जाहीर प्रदर्शन करतो त्यात मुळात माणुसकी किती असेल हा प्रश्न येतो ? वस्तू निर्जीव असली तरी तिच्यावर पाय ठेवणे याला मूर्खपणा नाहीतर काय म्हणावे ? काही जणांना सवय असते ज्या वस्तू हाताने बाजूला करता येतात त्या वस्तू पायाने बाजूला करणे. उदा. बाथरूममधील बालदी. अहो, ते काय पाय पुसणे आहे का ? कुठे कोणत्या अवयवाचा उपयोग करायचा याचे तारतम्य नसले की चुकीची कृती होते. कोणतीही ट्रॉफी हातातच घेतात. मात्र तिच्यावर पाय ठेवणे हे कृत्य अज्ञानातून झाले आहे असे वाटत नाही. तर ते जाणीवपूर्वक केले आहे. हेच लक्षात येते.

- जयेश राणे
मुंबई

# भविष्याची चिंता...



सोनू दरेगावकर
संपर्क क्र. 7507161537

आधुनिक केसरी

**जसं जसं वय निघून जात आहे, तसं- तसं मनाला चटका आणि फटका मात्र पुन्हा पुन्हा बसत आहे. त्याचं कारण सुशिक्षित बेकार आणि लहानपणीच वेळेवर संस्कार न मिळाल्याने या सर्व गोष्टीचा सामना करत जीवन जगावं लागतच. सर्वच दिवस सारखे नसतात हे जरी खरं असलं तरी पण असलेल्या दिवसाला समाधान कसं मानायचं, अजून सुद्धा कळालच नाही बरं? ते का कळालं नसेल कारण यावर आपण कधी विचार केला नसेल. जरी विचार केला असेल तरी तो आचरणात आणला नसेल, जर कधी आणला असेल तरी त्याचा पाठपुरावा केला नसेल जर केला असेल तरी तो सापडला नसेल. सर्व काही मिळतं असत परंतु धीर धरावा लागतो. कारण ज्या गोष्टी धीर धरायला शिकतो तेव्हा मात्र मनाला आपण स्वतः स्थिर ठेवायला लागतो.**

कष्टाने सर्वकाही मिळवायचं असतं मग ते कष्ट प्रामाणिक असेल तर तिथं कुठल्याही मदतीची गरज सुद्धा भासत नाही. परंतु कष्ट करण्याची हिम्मत मात्र अनेकाजवळ उपलब्ध नाही. त्याचं कारण जे आम्हाला मिळावं त्यात आम्ही सुख आणि समृद्ध व्हावं परंतु ते मिळवण्यासाठी आम्हाला कुठल्याही प्रकारची मेहनत लागता कामा नये, जर ते लागत असेल तर आम्हाला ते मिळविल्यासारखं वाटत नाही. अश्या आळशीपणाच्या लक्षणामुळे माणसांच्या भविष्याची आणि आयुष्याची वाट लागून जात आहे. हे मात्र पाहायला मिळत आहे.

जेव्हा वेळ निघून जाते तेव्हा मात्र मनुष्य चिंतेमध्ये अडकलेला असतो. मग ज्या गोष्टी आपण वेळेत करायला हव्या होत्या त्या मात्र आपण केलं नाही असा पश्चाताप करून स्वतःला दोष देऊन चिंताजनक स्वतः मनस्ताप करून भटकंती सुरू करतो. या भटकंतीमुळे तो कोणत्या मार्गावर जात आहे, त्याला कळायला सुद्धा तयार नसते. आपण जे करतो ते योग्य का अयोग्य हे त्याला समजून सांगण्यासाठी कुठलाही मार्ग त्याच्याकडे उपलब्ध नसतो कारण तो चिंतेत अडकलेला असतो.

माझं कसं होईल, मी कसा जगू, जरी जगलो तरी कशासाठी? माझ्या जगण्याचा उद्देश काय? या सर्व गोष्टी त्याच्या मनामध्ये खेळत असतात म्हणून भविष्याची चिंता करत असताना आयुष्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर मात करता आले पाहिजे. जीवन जगत असताना सुख - दुःख, यश - अपयश, चढ - उतार येतात. प्रत्येकाला संकटाशी दोन हात करावे लागतात. सर्वांचे जीवन हे असंख्य संकटांनी भरलेले आहे. मात्र या संकटांना जो हिमतीने सामोरे जाण्याचे धाडस दाखवतो तोच यशस्वी होतो. केवळ दाखवण्यापूर्ती भविष्याची चिंता न करता प्रत्येकाने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यशाची शिखरे पार करावी.



# पाण्याची नासाडी थांबवणे आवश्यक



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**पाणी हे मानवी अस्तित्वासाठी सर्वात उपयुक्त नैसर्गिक स्त्रोत आहे. हे केवळ ग्रामीण आणि शहरी भागातील स्वच्छतेबाबत महत्त्वाची भूमिका बजावत नाही, तर औद्योगिक क्षेत्रातील सर्व प्रकारच्या कृषी आणि उत्पादन प्रक्रियेसाठी देखील आवश्यक आहे. भारतातील जलस्रोतांची उपलब्धता आणि वापर याबाबत काही तथ्ये विचारात घेतल्यास, हे स्पष्ट होते की, जागतिक ताज्या जलस्रोतांपैकी फक्त चार टक्के जलस्रोत देशात उपलब्ध आहेत. साहजिकच त्यामुळे भारताला जगातील १८ टक्के लोकसंख्येला पाणी पुरवावे लागते.**

देशातील एकूण पाण्याच्या वापरापैकी सुमारे 85 टक्के पाणी कृषी क्षेत्रात वापरले जाते, तर 10 टक्के पाणी औद्योगिक क्षेत्रासाठी वापरले जाते आणि केवळ 5 टक्के घरांमध्ये वापरले जाते.

सन 1994 मध्ये प्रति व्यक्ती पाण्याची उपलब्धता सहा हजार घनमीटर होती, जी 2000 मध्ये 2300 घनमीटर इतकी कमी झाली आणि 2025 पर्यंत ती आणखी कमी होऊन १६०० घनमीटरवर येण्याचा अंदाज आहे. याउलट, 2030 सालापर्यंत भारतातील पाण्याची मागणी त्याच्या पुरवठ्याच्या तुलनेत जवळपास दुप्पट होईल. आपल्या देशात शुद्ध पिण्याच्या पाण्याची कमतरता आहे. आकडेवारी दर्शवते की भारतातील शहरी भागातील 970 लाख लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही. देशाची राजधानी दिल्लीबद्दल बोलायचं तर भारतीय मानक ब्यूरोने जारी केलेल्या अहवालात असे दिसून आले आहे की दिल्ली जल बोर्डाने वितरित केलेले पाणी बीएसआय मानकांची पूर्तता करत नाही आणि ते पिण्यायोग्य नाही. आपल्या ग्रामीण भागातही पिण्याच्या पाण्याची स्थिती फारशी चांगली नाही. तसेच सुमारे 70 टक्के लोकांना प्रदूषित पाणी प्यावे लागत आहे आणि 33 कोटी लोकांना दुष्काळी भागात राहावे लागत आहे. एकूणच, भारतातील सुमारे 70 टक्के पाणी प्रदूषित आहे. देशात आधीच मर्यादित प्रमाणात पाणी उपलब्ध आहे, तरीही पाण्याचा अपव्यय सुरूच आहे. हा प्रवृत्ती धोकादायक आहे. ज्या वेगाने पाण्याचा अपव्यय होत आहे, त्यामुळे आपले भविष्य खूप भीतीदायक ठरू शकते. भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे. नद्या कोरड्या पडत आहेत. पाणथळ जागाही धोक्यात आल्या आहेत. 140 कोटी लोकसंख्या असलेला आपला देश जलसंधारणाबाबतही गंभीर नाही, देशाची आर्थिक राजधानी म्हटल्या जाणाऱ्या मुंबईतच दररोज वाहने धुण्यात सुमारे पन्नास लाख लिटर पाणी वाया जात आहे. दिल्ली, मुंबई आणि चेन्नईसारख्या महानगरांमध्ये पाईप लाईन लिकेजमुळे दररोज 17 ते 44 टक्के पाणी वाया जाते. देशातील नद्यांची स्थिती दयनीय असून गंगा प्रदूषणमुक्त करण्याच्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळालेले नाही. त्यामुळे देशातील नद्यांच्या स्थितीचा गांभीर्याने विचार करून त्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी योग्य धोरणे आखण्याची गरज आहे.

पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे, पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्याची गरज अनेक वर्षांपासून देशभरात जाणवत आहे. जल व्यवस्थापनामध्ये पूर, दुष्काळ आणि जलप्रदूषण इत्यादीसारख्या पाण्याच्या टंचाईशी संबंधित जोखमींचे व्यवस्थापन देखील समाविष्ट आहे. हे व्यवस्थापन स्थानिक प्रशासन तसेच वैयक्तिक पातळीवर केले जाऊ शकते. योग्य पाणी व्यवस्थापनामध्ये पाण्याचे अशा प्रकारे व्यवस्थापन करणे समाविष्ट आहे की सर्व लोकांना त्यांना आवश्यक असलेले पाणी मिळू शकेल. देशातील नद्या, सरोवरे, तलाव या जलस्रोतांमधील प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. देशाच्या बहुतांश भागात भूजल पातळी तुलनेने लक्षणीय खाली गेली आहे. युनेस्कोच्या अहवालात भारत हा जगातील सर्वात जास्त भूगर्भातील पाण्याचा वापर करणारा देश असल्याचे समोर आले आहे. जलस्रोत मर्यादित आहेत आणि पुढील पिढ्यांसाठीही आपण त्यांचे संवर्धन केले पाहिजे. जलसंकटाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही नकारात्मक परिणाम होतो. जलव्यवस्थापनाच्या मदतीने हा नकारात्मक परिणाम टाळून जलसंकट दूर करता येईल. जलसंधारणाच्या दृष्टीकोनातून पाण्याची मागणी आणि पुरवठा यातील अंतर कमी करणे, अन्न उत्पादनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे आणि स्पर्धात्मक मागण्यांमध्ये वापर संतुलित करणे, महानगरे आणि इतर मोठ्या शहरांची वाढती मागणी पूर्ण करणे व शेजारील देश आणि राज्ये इत्यादींमध्ये पाणी वाटपाशी संबंधित समस्यांना सामोरे जाणे हेदेखील महत्त्वाचे आहे. 2018 मध्ये नीती आयोगाने इनोव्हेटिव्ह इंडिया 2075 रणनीती जारी केली होती, ज्या अंतर्गत असे ठरवण्यात आले होते की 2022-23 पर्यंत भारताच्या जल संसाधन व्यवस्थापन धोरणाने जीवन, शेती, आर्थिक विकास, पर्यावरण आणि पर्यावरणासाठी पाण्याची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित केली पाहिजे. त्यासाठी पाण्याच्या सुरक्षेची सोय असावी. या धोरणामध्ये नागरिक आणि प्राण्यांना पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, सर्व शेतांमध्ये योग्य सिंचन व्यवस्था सुनिश्चित करणे आणि शेतीच्या पाण्याचा वापर सुधारणे आणि गंगा आणि तिच्या उपनद्यांचा अखंड आणि स्वच्छ प्रवाह सुनिश्चित करणे आदी गोष्टी समाविष्ट आहेत.



मात्र, भारतात पाण्याची कमतरता नाही. आपल्या देशातील मुख्य नद्यांव्यतिरिक्त, आपल्याला दरवर्षी सरासरी 11.70 कोटी घनमीटर पावसाचे पाणी मिळते. याशिवाय अक्षय जलसंधारणामुळे दरवर्षी 1608 अब्ज घनमीटर पाणी उपलब्ध होते. आपल्याकडे जगातील नवव्या क्रमांकाचा 'गोड्या पाण्याचा साठा' आहे. असे असूनही, भारतात प्रचलित असलेली पाण्याची समस्या पाण्याच्या कमतरतेचे नव्हे तर जलसंधारणाचे आमचे चुकीचे व्यवस्थापनामुळे जाणवत आहे.

जलसंधारण ही आजच्या काळाची गरज आहे. त्यासाठी योग्य निचरा आणि सांडपाण्याची विल्हेवाट स्वच्छ व सुरक्षित पद्धतीने करण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. या प्रणालीअंतर्गत सांडपाण्याचा पुनर्वापर करून ते वापरण्यायोग्य बनवले जाऊ शकते, जेणेकरून ते लोकांच्या घरी पिण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी पाठवले जाऊ शकते. दुष्काळग्रस्त भागात चांगल्या दर्जाची सिंचन व्यवस्था सुनिश्चित करता येते. पाण्याचा अपव्यय होऊ नये म्हणून या यंत्रणांचे व्यवस्थापन करता येते. अनावश्यक पाणी टंचाई टाळण्यासाठी पुनर्नवीनीकरण किंवा पावसाचे पाणी देखील वापरले जाऊ शकते. देशात जलसंधारणावर दिलेला भर पाहता, कोणत्याही घटकाने, मग ती व्यक्ती असो किंवा कंपनी, उपकरणांचा अनावश्यक वापर कमी करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांच्या साफसफाई आणि देखभालीमध्ये दररोज अनेक लिटर पाणी वाया जाईल. तसे झाले तर पाणी वाचवले जाऊ शकते. पावसाचे पाणी पृष्ठभागावर साठवून जलसंधारण करता येते. त्यासाठी टाक्या, तलाव, चेकडॅम इत्यादींची योग्य व्यवस्था करता येईल. देशातील जल प्रशासन संस्थांच्या कामकाजात नोकरशाही, पारदर्शक आणि गैर-सहभागी दृष्टीकोन अजूनही चालू आहे. हे संपवण्याची गरज आहे.

दुष्काळ आणि पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींशी संबंधित विश्वसनीय माहिती आणि डेटा लवकरात लवकर उपलब्ध होणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना वेळीच सामोरे जाता येईल आणि संभाव्य नुकसान कमी करता येईल. भूजल पातळी वाढवणे आणि भूजल वापराचे नियमन करणे यासंबंधीचे महत्त्वाचे निर्णय त्वरीत घेतले जाणे आणि त्याची त्वरित अंमलबजावणी करणे देखील महत्त्वाचे आहे.

# विश्व विजयाचे स्वप्न भंगले

आधुनिक केसरी

रविवारची सकाळ उगवली ती मोठी आशा आकांक्षा घेऊन. गेल्या बारा वर्षांपासून मनात धरलेले स्वप्न साकार होणार अशी आशाच नाही तर विश्वास भारतातील १४० कोटी जनतेला होता आणि हा विश्वास सार्थच होता कारण संपूर्ण विश्वचषकात भारत जेत्या प्रमाणे खेळला. भारताने खेळलेले सर्वच्या सर्व दहा सामने जिंकले; जिंकलेच नाही तर समोरच्या संघाचे अक्षरशः पानिपत करून एकहाती जिंकले. अंतिम फेरीत प्रतिस्पर्धी असलेल्या ऑस्ट्रेलियालाही साखळी सामन्यात सहज नमवले त्यामुळे भारतच विश्वविजेता होणार असा विश्वास केवळ क्रिकेट प्रेमिंनाच नव्हे तर या खेळातील जाणकारांनाही होता. अंतिम फेरीत ऑस्ट्रेलिया जिंकेल असे भाकीत एकाही तज्ज्ञाने केले नव्हते त्यामुळे दुपारी दोनच्या सामन्यासाठी बारा वाजल्यापासून प्रेक्षक टीव्ही कडे डोळे लावून बसले होते. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजी दिल्यावर प्रत्येक जण भारत किमान ३०० धावा करेल असे छातीठोकपणे सांगत होते. प्रत्यक्ष सामना सुरू झाल्यावर भारताने त्याच दिशेने आगेकूच केली. शुभमन गिल लवकर बाद झाला तरी कर्णधार रोहित शर्मा आपल्या नेहमीच्याच स्फोटक अंदाजात फलंदाजी करत होता. पहिल्या पॉवर प्ले मध्ये भारताने नेहमीसारखीच मोठी धावसंख्या फलकावर लावली मात्र रोहित शर्मा बाद झाला आणि चित्र पालटायला सुरवात झाली. रोहित बाद झाला पाठोपाठ श्रेयस अय्यर ही बाद झाला. लागोपाठच्या षटकात दोन प्रमुख फलंदाज बाद झाल्याने विराट व राहुलवर दबाव आला. आणखी विकेट पडू नये यासाठी त्यांनी आपल्या नैसर्गिक खेळाला मुरड घालून खेळपट्टीवर टिकण्याचा प्रयत्न केला त्यामुळे धावांचा वेग मंदावला. ऑस्ट्रेलियन कर्णधार कमिंसने गोलंदाजीत योग्य वेळी बदल केला. गोलंदाजांनीही भेदक गोलंदाज केली त्यांना क्षेत्ररक्षकांनी योग्य साथ दिल्याने एका पाठोपाठ एक विकेट पडत राहिल्या आणि भारतीय संघ २४० वरच अडखळला. विश्वचषकाच्या अंतिम फेरीत ही धावसंख्या कमीच होती मात्र भारतीय गोलंदाज फॉर्मात असल्याने या धावसंख्येचाही बचाव करतील अशी आशा क्रिकेट प्रेमींना होती मात्र पहिले तीन विकेट पडल्यावर हेड आणि लाबुशेन यांनी डाव सावरत संघाला विजय मिळवून दिला आणि १४० कोटी जनतेचे १२ वर्षाचे स्वप्न भंगले. भारताच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने क्रिकेट प्रेमिंमध्ये निराशा पसरली अर्थात खेळाडूंना ही खूप वाईट वाटले. खेळाडू मैदानावरच रडू लागले. मैदाणाप्रमानेच घराघरात प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रू आले. भारतीय संघ अंतिम फेरीत पराभूत झाला असला तरी संपूर्ण देश खेळाडूंच्या पाठीशी ठामपणे उभा आहे कारण तो दिवस आपला नव्हताच. प्रत्येक संघासाठी स्पर्धेत एक तरी दिवस वाईट येतोच त्या दिवशी संघाच्या बाजूने काहीच घडत नाही. भारताच्या दुर्दैवाने हा दिवस अंतिम फेरीत आला भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अर्थात भारतीय खेळाडूंनी त्यांचे सर्वस्व पणाला लावले मात्र नशिबाने साथ दिली नाही. संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने जेत्या प्रमाणे कामगिरी केली. अकरा पैकी दहा सामने जिंकून आपणच सर्वोत्तम असल्याचे दाखवून दिले. एका पराभवाने भारतीय संघाचे श्रेष्ठत्व कमी होत नाही. त्यांच्या या कामगिरीचा देशातील १४० कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. भारतीय संघाचे विश्व विजयाचे स्वप्न भंगले असेल तरी त्यांनी त्यासाठी केलेले प्रयत्न वाया गेले नाहीत. भलेही यावेळी आपण विश्वविजय मिळवू शकलो नाही तर पुढील विश्वचषकात भारतीय संघ विश्वचषकावर देशाचे नाव कोरल यात शंका नाही.

श्याम ठाणेदार

# गल्ली ते दिल्ली एकच आवाज 'व्हॉईस ऑफ मीडिया'

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** देशभरातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना म्हणून विक्रम प्रस्थापित करणारी व्हॉईस ऑफ मीडिया, या राष्ट्रीय संघटनेचे नुकते



वसंत खडसे
9373578429

बारामतीमध्ये गदिमा सभागृहात महाराष्ट्र राज्य शिखर अधिवेशन पार पडले आहे. सदर अधिवेशनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारोंच्या संख्येने पत्रकारांची उत्स्फूर्त उपस्थिती हे या देशातील सर्वात मोठ्या संघटनेची विक्रमी नोंद अधोरेखित करणारी बाब ठरली आहे. अधिवेशनासाठी राज्यातील विविध पक्षाच्या बड्या नेत्यांनी लावलेली हजेरी या राष्ट्रीय संघटनेच्या मानांकनात मानाचा तुरा खोवनारी ठरली आहे. दरम्यान, व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के आणि इतर राज्य व राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे जणू काही गल्ली ते दिल्ली एकच आवाज घुमत होता. " व्हॉईस ऑफ मीडिया " याची अनुभूती राज्याच्या कानाकोपऱ्यातून जमलेल्या अनेक पत्रकारांनी बोलून दाखवली आहे. पत्रकार व पत्रकारितेसाठी लढणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या शिखर अधिवेशनात संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष यांनी मांडलेला पंचसूत्री ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला. शिवाय, पत्रकारिता करणाऱ्यांना विशेष




माहिती शिकण्यास मिळाली आहे. या सर्व गोष्टीचा मी स्वतः साक्षीदार आहे. त्या अनुषंगाने माझ्या कुवती प्रमाणे घेतलेला हा संक्षिप्त आढावा आधुनिक केसरीच्या माध्यमातून प्रस्तुत करीत आहे. बारामती येथे पार पडलेल्या अधिवेशनाला देशाचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, सुनेत्राताई पवार, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार हेमंत पाटील, ज्येष्ठ विचारवंत पोपटराव पवार आदींनी आजची राजकीय स्थिती व त्यावर पत्रकारांकडून अपेक्षित असलेले योगदान या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, कार्याध्यक्ष संजय आवटे, सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, राष्ट्रीय उपाध्यक्ष मंदार फणसे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ आदींना पत्रकारांना भेडसावणाऱ्या ज्वलंत समस्या वर प्रकाश झोत टाकून पत्रकारांच्या विविध मागण्या पैकी किमान पत्रकारांसाठी घर, पत्रकारांच्या मुलांचे शिक्षण, अपघात आणि भविष्य निर्वाह विमा, पत्रकारांना नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, आणि सेवानिवृत्त वेतन या पाच मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी अधिवेशनात " पंचसूत्री " ठराव मांडला होता. सदर ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला. अवघ्या तीन वर्षाच्या काळात संघटनेने देशभरातील पत्रकारांसाठी व त्यांच्या समस्या निवारण्यासाठी उभा केलेला लढा, अल्पावधीतच एक मोठी चळवळ म्हणून नावारूपास आला आहे. त्या अनुषंगाने राज्यभरातील पत्रकारांच्या अधिकाधिक समस्या जाणून घेता याव्यात, व त्यावर योग्य मार्ग काढल्या जावा. या उद्देशाने बारामती येथे शिखर अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर अधिवेशनात पत्रकारितेत विशेष योगदान देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार व लेखकांचा जीवनगौरव व सेवा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यामध्ये पुण्यनगरीचे संस्थापक संपादक मुरलीधर शिंगोटे यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या वतीने हा पुरस्कार प्रवीण शिंगोटे यांनी स्वीकारला. तसेच राज्यातील ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, श्रीराम पवार, श्री कुमार सप्तर्षी, जयश्री खाडीलकर, श्री प्रकाश पोहरे, श्री आदिनाथ चव्हाण आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. महिलांचे पत्रकारिता क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन अधिवेशनात विशेष चर्चासत्र घेण्यात आले होते. त्यामध्ये रेणुका कड, सारिका महोत्रा, शैलजा जोगल, सुकेशनी नाईकवाडे यांनी सहभाग घेतला होता. या व्यतिरिक्त पत्रकारितेमधील अस्वस्थता, पत्रकारिता बदनाम होण्यामागची कारणे इतर विविध विषयावर चर्चासत्रांचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते.



"आज देशातील एकंदरीत माध्यमांची स्थिती बदललेली आहे. पत्रकारांना स्वत :चे मत मांडायला, भूमिका घ्यायला वाव कमी आहे. ही वस्तुस्थिती आज आहे. तरीसुद्धा सत्य आणि योग्य असेल तर मांडा. पण कुणाच्या सूचनेवरून भूमिका ठरवू नका कारण सामान्यांच्या अपेक्षेचे ओझे पत्रकारितेवर आहे. हा जो " व्हाईस " आहे तो दुबळा होऊ देऊ नका..!

**शरदचंद्र पवार ( राष्ट्रीय नेते )**



"राज्यभरातून अधिवेशनात सहभागी झालेले असंख्य पत्रकार हीच या अधिवेशनाची खरी ताकद आहे. मी केवळ नाममात्र आहे. त्यासाठी माझे कौतुक नको, संघटनेसाठी योगदान द्या..!

**संदीप काळे, ( संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष ) व्हॉईस ऑफ मीडिया.**

अधिवेशनासाठी राज्यभरातून आलेल्या पत्रकारांची गैरसोय होऊ नये म्हणून, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, कार्यालयीन महासचिव दिव्या भोसले, यांच्यासह सर्व राज्य कार्यकारणी पदाधिकारी आणि विभागीय अध्यक्ष तसेच सर्व जिल्हाध्यक्ष यांनी चोख काळजी घेतली होती. माझ्या पत्रकारितेच्या नजरेतून " विकास मॉडेल बारामती " या कार्यक्रमांतर्गत सहभागी सर्व पत्रकारांना बारामती दर्शन घडवून अधिवेशनाची सांगता झाली. भरगच्च भरलेल्या शिखर अधिवेशनाचे आपल्या रसाळ वाणीतून मोजक्या शब्दात बहारदार सूत्रसंचालन करणाऱ्या संघटनेच्या महिला विंग कार्याध्यक्ष फराह खान यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

## भारत राठोड यांची तेलंगणा विधानसभेसाठी प्रचार प्रभारी म्हणून नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** राजकारणातील काँग्रेस पक्षाचे खासदार तथा काँग्रेस पक्षाचे महासचिव मुकुलजी वासनिक तथा नानाभाऊ पटोले प्रदेश अध्यक्ष काँग्रेस पार्टी महाराष्ट्र यांच्या आदेशाने संजयजी भाऊ राठोड काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष ,बुलढाणा जिल्ह्याचे काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे तसेच तेलंगणा राज्याचे प्रभारी माणिकरावजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने काँग्रेस पक्षाचे कामकाज बघता व काँग्रेस पक्षासाठी केलेलं काम बगता आज भारत रामराव राठोड यांची प्रभारी म्हणून तेलंगणा राज्य विधानसभा निवडणुक बासवाडा विधानसभा 2023 साठी प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.ही एक आनंदाची बाब लोणार तालुक्यासाठी असून एकदम अशा कमी वयामध्ये राजकारणामध्ये ठसा उमटत व अनेक पद भुषवत अशी चांगली प्रकारची कामगिरी भारत राठोड यांनी केलेली आहे.आणि ते सतत पक्षाशी एकनिष्ठ असल्याकारणाने आज पक्षाची एवढी मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे. झालेल्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## सपोनि यांच्याकडून कै.आनंद मळाळे यांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** सपोनि कै.आनंद (बंटी) मळाळे यांचे दीड महिन्यापूर्वी अपघाती निधन झाले होते. त्यामुळे मळाळे यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.मळाले यांच्या कुटुंबांचे सांत्वन सत्र क्रमांक110,महाराष्ट्र राज्य सपोनि यांच्याकडून करण्यात आले. तसेच कै.आनंद(बंटी)मळाळे यांच्या कुटुंबाला आपापल्या परीने खारीचा वाटा उचलत मदत म्हणून 6 लाख 73हजार जमाकरण्यात आली. या जमा केलेल्या रक्कमेचा धनादेश कै.आनंद(बंटी)मळाळे यांच्या पत्नी श्रीमती वंदना मळाळे व कुटुंबाकडे महामार्ग पोलीस केंद्र, येडशी येथील कार्यालयात सुपूर्त करण्यात आला व भविष्यात कोणत्याही अडचणीमध्ये आम्ही सर्वजण मळाळे कुटुंबीयांसोबत आहोत.अशी भावना सत्र



क्रमांक 110,महाराष्ट्र राज्य सपोनि त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कै.आनंद(बंटी) मळाळे यांच्या कुटुंबाकरीता आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्त करण्यासाठी सत्र क्रमांक-110, महाराष्ट्र राज्य सपोनि चे अधिकारी सपोनि श्री शिंदे, सपोनि श्री चासकर,सपोनि श्री नेहरकर,सपोनि श्री तवार,सपोनि श्री खरड,सपोनि श्री इंगळे,सपोनि श्री भराटे, सपोनि श्री राठोड, सपोनि श्री कदम सर्व उपस्थित होते.

## आरक्षण अंमलबजावणीसाठी धनगर समाजाचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिनिधी शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाजवळ धनगर समाजाच्या वतीने धनगर समाज अनुसूचित जमाती आरक्षण अंमलबजावणीसाठी धनगर समाज बांधव मेंढ्यासह दि १९ रविवारपासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

सरकारने दिलेल्या खोट्या आश्वासनाच्या निषेधार्थ धनगर समाज अनुसूचित जाती आरक्षण अंमलबजावणीसाठी गंगापूर तालुक्यातील शिरूडी येथील मेंढपाळ हरिश्चंद्र वैद्य हे आपल्या मेंढ्यासह आमरण उपोषणाला बसले आहे. धनगर समाजाला शासन आरक्षण अंमलबजावणीच्या संदर्भात खोटे आश्वासन देऊन समाजाची दिशाभूल करत आहे. धनगर समाज हा राज्यघटनेमध्ये अनुसूचित जमात असताना आणि भारतीय जनता पार्टीचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्ता



आल्याच्या नंतर पहिल्या कॅबिनेट मीटिंगमध्ये आरक्षण देतो असे आश्वासन दिले होते. तसेच चौंडी येथे समाज बांधव उपोषणाला बसले असताना शासनाचे प्रतिनिधी गिरीश महाजन यांनी देखील येऊन पन्नास दिवसात आरक्षणाचा विषय मार्गी लावू असे आश्वासन दिले होते शासन समाजाला आरक्षणासाठी झुलवत ठेवत आहे. धनगर समाजाच्या परिस्थिती हालकीची असून आरक्षणाच्या सवलती भेटत नसल्याकारणाने समाजाचा शैक्षणिक, राजकीय सामाजिक स्तर अतिशय खालवला असून अतिशय वाईट वेळ ही समाजातील युवकावर आली आहे अशा परिस्थितीत शासन केवळ खोटे आश्वासन देत प्रत्यक्षात काहीच देत नाही कुठल्याही प्रकारे धनगर समाजाच्या लाभार्थ्याला घरकुलाचा लाभ भेटला नाही शेळ्या देतो मेंढ्या देतो धनगर समाजाच्या तांडा वस्तीला निधी देतो असे अनेक खोटे आश्वासन देण्यात आले. परंतु प्रत्यक्षात कुठेही अंमलबजावणी झाली नाही अशा या सर्व निष्क्रिय धोरणामुळे आज समाजावर आमरण उपोषणाला बसण्याची वेळ आली आहे.

यावेळी धनगर समाजाचे नेते रामनाथ मंडलिक, रंगनाथ राठोड, अरुण रोडगे, संपत रोडगे, संजय फटांगडे, दिलीप रेठे, प्रवीण देवकर, अशोक करडे, रमेश मतकर, सतीश पाल्हाळे, पृथ्वीराज तोगे, रामेश्वर लाव्हाळे, विजय वैद्य, बापू पोकळे, प्रदीप नाचन,ज्ञानेश्वर बडूगे, श्याम गुंजाळ, रमेश काटकर, बंटी सोनवणे, गणेश रोडगे, अशोक नाचन, रमेश मतकर, अशोक बुट्टे, बाबासाहेब नजन, नामदेव डव्हान ,संतोष काटकर, यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित आहे.

## सोयगाव तालुक्याचे पंचनामे पूर्ण : सिसोदिया

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात तालुक्यात सोयगाव कृषी विभागाच्या वतीने पथकांनी दुष्काळाच्या संदर्भात ३३ टक्क्यांपेक्षा जास्त बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण केले असून यामध्ये खरिपाच्या ४२ हजार ३७३ लागवडी योग्य क्षेत्रापैकी ४२ हजार ३२८ हेक्टरवर खरिपाची पिके बाधित झाल्याचा अहवाल शनिवारी दि.१९/११/२३ तालुका कृषी विभागाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे पाठविला आहे. आता सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे. तालुक्यात शासनाने अति गंभीर दुष्काळाची घोषणा महिनाभर पूर्वी केली होती. त्या अनुषंगाने दुष्काळामध्ये ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेल्या कपाशी, तूर, मका सोयाबीन, उडीद, ज्वारी, बाजरी या प्रमुख सात खरिपाच्या पिकांची सर्वेक्षण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले होते. त्यानुसार तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी कृषीच्या विविध पथकांनी बाधित क्षेत्राचे पंचनामे हाती घेतले होते. यामध्ये सोयगाव तालुक्यात दुष्काळाच्या छायेत ४२ हजार ३२८ हेक्टरवर पिके ३३ टक्क्यांच्या पेक्षा अधिक बाधित असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. तालुक्यात यंदा दुष्काळात कपाशीच्या पिकांना सर्वाधिक फटका बसला असून ३५ हजार ०६२ हेक्टरवर कपाशीच्या पिकांचे ३३ टक्क्यांच्या पेक्षा अधिक नुकसान झाले आहे.

## आनंद ग्रुप ऑफ हॉस्पिटलमध्ये सैनिक व कुटुंबीयांना मोफत वैद्यकीय सुविधा!

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आयुष्यमान भारत कार्ड धारक सेवारत व सेवानिवृत्त बी.एस.एफ. जवान, तसेच सी.आर.पी.एफ. जवान व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय सेवा विनाशुल्क देण्यासाठी आनंद ग्रुप हॉस्पिटल कटिबद्ध आहे असे या रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अमोल अन्नदाते यांनी मंगळवार(ता.२१)रोजी प्रतिपादित केले, ऑल इंडिया सेंट्रल एक्स पॅरामिलिटरी वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र चे सचिव गौतम गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी डॉ. अन्नदाते याना आयुष्यमान कार्ड धारक सेवारत आणिसेवानिवृत्त जवानांना वैद्यकीय सेवा विनाशुल्क द्यावी असे निवेदन सोपविले त्या प्रसंगी ते बोलत होते, ते पुढे म्हणले की,जे जवान सीमेचे रक्षण करीत आहेत किंवा ज्यांनी केलेले आहे त्यांच्या साठी आनंद हॉस्पिटल ची दारे सदैव उघडी आहेत, राजपूत व गायकवाड यांनी त्यांचे अभिनंदन केले या प्रसंगी त्यांचे बंधू डॉ,अभिजित अन्नदाते व सहाय्यक सुवर्णा बोर्डे ही उपस्थित होते. यासाठी सेवारत व सेवानिवृत्त सैनिकांनी आपली व कुटुंबियांची नोंद या रुग्णालयात श्रीमती सुवर्णा बोर्डे कडे करणे आवश्यक आहे. आवश्यक कागद पत्रे दाखल करून ही नोंद केल्यानंतर वैद्यकीय सुविधा निशुल्क मिळतील या साठी गौतम गायकवाड यांच्याकडे ही संपर्क साधावा व मार्गदर्शन घ्यावे असे आवाहन ही करण्यात आले आहे. या प्रसंगी बी.एस. एफचे सेवानिवृत्त जवान व उपाध्यक्ष सोपान गाढे, सीआरपीएफचे नितीन त्रिभुवन, विष्णू मोईन, संजय काळे, तुकाराम गायकवाड, बी. एस. एफचे दत्तू निकम, तुषार गायकवाड यांची उपस्थिती होती.

# संगणक परिचालकांचे कामबंद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**भोकर :** तालुक्यातील ग्रामपंचायतीचे संगणक परीचालक विविध मागण्या संदर्भात मागील अनेक दिवसांपासून वरिष्ठांकडे तक्रारी करूनही दखल घेत नसल्याने बेमुदत कामबंद आंदोलन करणार आहेत. गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सद्य स्थितीत ग्रामविकास विभागास जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या अभिप्राया आधारे ग्रामपंचायतच्या सुधारित आकृतीबंधाची फाईल वित्त विभागास त्वरित पाठवून संगणकपरिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे, संगणक परिचालकांना सुधारित आकृतीबंधानुसार कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळे पर्यंत २००००/- रुपये मासिक मानधन देणे. नव्याने सुरू केलेली चुकीची टार्गेट सिस्टिम रद्द करणे, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या जुन्या संगणकपरिचालकांना नियुक्ती देणे व ज्यांची नियुक्ती झाली आहे त्यांना मागील ७ महिन्यापासून मानधन मिळाले नाही त्यांना त्वरित मानधन अदा करण्याची करावे अशी मागणी आहे.करण्यात आली आहे. निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष विष्णू राठोड, उपाध्यक्ष स्मिता चौदंते, सचिव संजय ढवळे पाटील, सदस्य योगेश दोंतीवार, संतोष खांडरे, प्रकाश सायनवार, प्रवीण राठोड, शिवाजी मेटकर तुळशीराम पपूलवाड, ज्योती मॅडम, संतोष खंडेलोटे, सुनील जाधव यांची उपस्थिती होती.

# मुलीवरील अमानुष अत्याचाराच्या घटनेची कसून चौकशी करा : गोऱ्हे

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** शहरातील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अमानुष अत्याचार प्रकरणातील आरोपीची कसून चौकशी करण्याचे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षकांना पत्राद्वारे दिले. शहरातील खदान परिसरात गुंडप्रवृत्तीच्या व व्यसनाधीन आरोपीने पीडित मुलीला सिगारेटचे चटके देत तिच्यावर अत्याचार केला. तिचे मुंडण करून सार्वजनिकस्थळी विवस्त्र करून अत्याचार केले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून गुन्हेगाराला कठोर शिक्षा व्हावी, यासाठी डॉ. गोऱ्हे यांनी अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे यांना चौकशीचे निर्देश दिले आहेत. पीअल्पवयीन मुलीवरील अमानुष अत्याचाराच्या घटनेची कसून चौकशी करा,"डित अल्पवयीन मुलीला मनोधैर्य योजनेतून ताबडतोब मदत देण्यात यावी, तसेच पीडितेच्या पुनर्वसनासाठी तिला सहकार्य करावे, आरोपीला जामीन मिळू नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, आरोपीची पार्श्वभूमी ही गुन्हेगारी असल्याने या घटनेशी संबंधित आरोपी आणि त्याचे साथीदार व इतर धागेदोरे याबाबत कसून चौकशी करत त्यांच्या विरोधातील सर्व पुरावे गोळा करावे, लवकरातलवकर आरोपपत्र दाखल करावे, या प्रकरणासाठी सक्षम सरकारी वकील देण्यात यावा, आदी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केल्या आहेत.

# भोकर काँग्रेस कमिटीची कार्यकारिणी जाहीर

## अशोक चव्हाणांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

आधुनिक केसरी न्यूज


**भोकर :** तालुक्यातील काँग्रेस आय कमिटीची तालुका, शहर, युवक,अल्पसंख्याक कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून नियुक्तीचे पत्र माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आले आहेत.

शहरातील तालुका काँग्रेस कमिटी कार्यालयात माजी मुख्यमंत्री चव्हाण, प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर, काँग्रेस आय कमिटीचे जिल्हाध्यक्ष गोविंदराव शिंदे नागेलीकर, यांच्या हस्ते निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी सौ. मंगाराणी अंबुलगेकर ,तालुकाध्यक्ष भगवान दंडवे, सभापती जगदीश पाटील, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर. उपसभापती बालाजी शानमवाड, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष मिर्झा ताहेर बेग, महिला शहराध्यक्ष सुलोचना ढोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

काँग्रेस पर्यावरण तालुकाध्यक्षपदी बाजीराव ऊर्फ शिवाजी पाटील लगळूदकर यांची तर काँग्रेस आय कमिटी तालुका उपाध्यक्षपदी राघोबा सोळंके , रंगराव कदम , काशिनाथ मेंडके , सत्यनारायण रेड्डी कोतुरवाड यांची तर सचिवपदी गंगाधर पाशमवाड, फारूख शेख, राजु करपे, रोहीदास जाधव, भागवत बाचेवाड, कोषाध्यक्षपदी विठ्ठल माचनवार यांची नियुक्ती करण्यात आली. भोकर शहर उपाध्यक्षपदी सचिन पांचाळ, मधुकर गोवंदे, शिवा हुंडेकर, शेख आतीक, शहर सचिवपदी दिगांबर देशमुख, सय्यद रफीक, कोषाध्यक्ष गौतम कसबे यांची निवड करण्यात आली.

युवक काँग्रेस तालुका उपाध्यक्षपदी धनराज पवार मोघळीकर, राजु बुलबुले, तालुका युवक काँग्रेस सचिवपदी गणेश रेड्डी बंकावार, नामदेव कोरंटुलू, कृष्णा चिल्लेवार, भोकर शहर युवक काँग्रेस शहर अध्यक्षपदी श्रीकांत दरबस्तवार, सचिव - जावेद अल्ली पटेल, सहसचिव सुजीत कोंडलवार, यांची निवड करण्यात आली. अल्पसंख्यांक तालुका उपाध्यक्षपदी शेख शफी रिठ्ठेकर, अहमद मियाँ कोळगांवकर,

अल्पसंख्याक शहर उपाध्यक्षपदी शेख मकबूल मदारशहाँ, शेख शादुल शेख खादर आदींची निवड करण्यात आली आहे. तालुका कार्यकारणीत सर्व समाज घटकांना न्याय देण्यात आल्याचे तालुकाध्यक्ष भगवान दंडवे यांनी सांगितले .




# समाज सेवेसाठी संवेदना महत्वाची : सुहासराव हिरेमठ

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** "निःस्वार्थ समाज सेवेसाठी संवेदना महत्वाची आहे. ही संवेदना कधीही क्षीण होता कामा नये. कारण संवेदनेतूनच समाजासाठी काम करण्याची प्रेरणा, उभारी मिळते," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ प्रचारक सुहासराव हिरेमठ यांनी केले. भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेला (मोतीबाग) जेष्ठ उद्योजक जयंत नातू आणि अश्वमेध परिवाराच्या वतीने एक कोटी रुपयांचा निधी समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. त्यावेळी हिरेमठ बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकर्ते प्रा. अनिरुद्ध देशपांडे, भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी, पुणे महानगर संघचालक रविंद्र वंजारवाडकर, उद्योजक जयंत नातू आदी उपस्थित होते. सुहासराव हिरेमठ म्हणाले, "आजच्या काळात सर्व काही मिळेल; पण दानशूर आणि समाजासाठी काही करण्याची प्रेरणा असणाऱ्या दात्यांची कमी आहे. आजच्या या कार्यक्रमातून समाजालाहीप्रेरणा मिळणारआहे. त्यांच्यातील संवेदना जागृत होण्यास मदत होणार आहे. प्रत्येकाने समाजासाठी, सेवा प्रकल्पासाठी संकल्प करायला हवा. दरवर्षी विशिष्ट रक्कम, वेळ सेवा प्रकल्पासाठी द्यावी. घरातील मंगलप्रसंगी सेवा प्रकल्पासाठी गरजूंना मदतीचा हात द्यावा." प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीमध्ये दातृत्व हा महत्वाचा गुण आहे. हा गुण जपण्याबरोबरच विकसित करण्याचा प्रयत्न करायला हवा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि समाज हे स्वतंत्र नाही तर एकरुप असे आहेत. समर्पण भावनेने काम करण्याची गरज आहे. ही भावना अशा कार्यक्रमामुळे वाढीस लागणार आहे. आजचा कार्यक्रम म्हणजे समर्पणाचे दर्शन घडवत आहे. जयंत नातू यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, राष्ट्रीय भावनेने काम करणारे कार्यकर्ते संघाच्या माध्यमातून तयार झाले आहेत. देशासाठी अनेक प्रचारक घडविले आहेत. समाज आणि संघाने आयुष्यात जे दिले त्याची परतफेड करता येत नाही; पण कर्तव्य भावनेतून हा निधी प्रदान करत आहे. राजीव जोशी यांनी संघ कार्याची आणि मोतीबाग संस्थेच्या नवीन बांधकाम प्रकल्पाबाबत माहिती सांगितली. अशोक वझे यांनी स्वागत केले. ॲड. पद्मा गोखले यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. मेधावी नातू यांनी स्वागत संघ गीत सादर केले. डॉ. पुष्पा रानडे यांनी वंदे मातरम् सादर केले.




# हंसराज अहीर यांच्या प्रयत्नाने गडचांदूर येथे फिरते रुग्णसेवा केंद्राचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**गडचांदूर :** औद्योगिक नगरी गडचांदूर येथे हिंदुस्थान कॉर्पोरेशन तथा वोक्हार्ट फाऊन्डेशन यांचे संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील रुग्णांच्या हितासाठी झटणारे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांचे विशेष प्रयत्न व सहकार्यातून राजूरा विधानसभा क्षेत्रातील चारही तालुक्याकरीता उपलब्ध झालेल्या फिरते रुग्णालय सेवा केंद्राचे लोकार्पण दि. 19 नोव्हेंबर रोजी गडचांदूर येथे आयोजित कार्यकमात पार पडले.

राजुरा विधानसभा हे दुर्गम क्षेत्र असल्याने या ठिकाणी ग्रामिण क्षेत्रात स्वास्थ्य सुविधांचा अभाव तसेच ग्रामिण कष्टकरी, शेतकरी व अन्य आजारी रुग्णांना कामधंदे सोडून शहराकडे उपचाराकरीता यावे लागते. त्यांना या फिरते रूग्णालय सेवा केंद्रामुळे मोठी सोय होणार असून नागरीकांनी या रुग्णालयाशी नाळ जोडून वैद्यकीय उपचार घ्यावा असे आवाहन हंसराज अहीर यांनी आपल्या उद्‌घाटकीय संबोधनातून केले. यावेळी हिंदुस्थान कार्पोरेशन लिमी. चे उपमहाप्रबंधक मुकूंद जवंजाळ यांनी याप्रसंगी सांगीतले की, सामाजिक दायीत्वाच्या भावनेतून ही सेवा या तालुक्यातील जनतेला देतांना मनस्वी आनंद वाटतो. या आरोग्य सेवेचा लाभ तालुक्यात सर्वदूर पोहचावा अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वोक्हार्ट फाऊन्डेशन मुंबईचे जितेश लांबीया माजी आमदार ॲड. संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, भाजपाचे लोकसभा विस्तारक खुशाल बोंडे, माजी जि.प. अध्यक्ष देवराव भोंगळे, जिल्हा शल्य चिकित्सक महादेव चिंचोळे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. कटाने, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्निल टेंभे, डॉ. गायकवाड यांचेसह गडचांदूर, राजुरा, जिवती तालुक्यातील बंधूभगिनींची बहूसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन निलेश ताजने यांनी केले. उपस्थितांचे आभार सतिश उपलेंचिवार यांनी मानले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शेतकरी, व्यापारी, हमाल, मापाडी व कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊनच निर्णय

## सभापती विक्रांत पाटील शिंदे : लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीची मासिक सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** कृषी उत्पन्न बाजार समितीची पहिली मासिक सभा काल दि. २० नोव्हें सोमवारी लोहा बाजार समिती कार्यालयात संपन्न झाली, यावेळी सभापती तथा शेतकरी कामगार पक्षाचे मराठवाडा सहचिटणीस विक्रांत पाटील शिंदे, उपसभापती अण्णाराव पवार, सचिव आनंद घोरबांड, सहाय्यक सचिव भोसीकर सह सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

यावेळी मासिक बैठकीत विविध विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दोन कमानींना रंगरंगोटी करण्यात येणार असून बाजार समिती सोनखेडच्या जागेवर प्लॉट अलाइनमेंट लवकरच करण्यात येणार असल्याचे सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी संचालक मंडळाला आश्वासित केले, कापूस व्यापारी, हमाल व्यापाऱ्यांची लवकरच बैठक घेऊन त्यांना धोरणात्मक सूचना करण्यात येणार असल्याची बैठकीत चर्चा करण्यात येऊन या सर्वांची बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले, सर्व शेतकरी,कर्मचारी, यांना विश्वासात घेऊनच यापुढे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिताचे धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी सांगून बाजार समिती कर्मचाऱ्याकडून बाजार समितीच्या पैशांमधील अतिरिक्त खर्च थांबावा व मनमानी व गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची कदापि गय केली जाणार नसल्याचे यावेळी सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी बैठकीत सांगितले, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पहिल्या मासिक बैठकीची सुरुवात वंदे मातरम गिताने झाली तर समारोप राष्ट्रगीताने करून सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले, यावेळी सर्व संचालक मंडळ, कर्मचारी उपस्थित होते.



# मैदानावरील कबड्डीचा सूर प्रत्यक्ष जीवनातही लागू द्या

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे कबड्डीपटूंना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मैदानावर कबड्डी खेळताना प्रत्येक संघ एक सूर, एक लक्ष आणि एक विचार घेऊन खेळतो. हाच विचार प्रत्यक्ष जीवनातही आचरणात आणावा, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी कबड्डीपटूंना केले. त्याचवेळी रात्री उशिरापर्यंत प्रेक्षकांमध्ये ऊर्जा कायम ठेवणाऱ्या सर्व कबड्डीपटूंना मुनगंटीवार यांनी शुभेच्छाही दिल्या. स्व. डॉ. सच्चिदानंदजी मुनगंटीवार यांच्या जयंतीनिमित्त भव्य जिल्हास्तरीय कबड्डी सामने आयोजित करण्यात आले आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी नालंदा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष समीर केने, नालंदा क्रीडा मंडळाचे महामंत्री मनीष पांडे, सुधीरभाऊ फॅन्स क्लबचे अध्यक्ष श्रीकांत आंबेकर, भाजपचे जिल्हा महासचिव निलेश खरबडे, गोगी दारीजी, मुन्ना ठाकूरजी, घनश्याम बुरडकर, राजू अनचुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाषण सुरू करण्यापूर्वी मुनगंटीवार यांनी भारत माता की जय, वंदे मातरम्, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय असा जयघोष केला. मैदानावर उपस्थित सर्व कबड्डीपटूंनी देखील त्यांच्यासोबत जयघोष केला. यावेळी खेळाडूंना शुभेच्छा देतानाचमुनगंटीवार यांनी डिसेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेची माहिती दिली. 'बल्लारपुर क्रीडा संकुल येथे २७ ते ३१ डिसेंबर २०२३ राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन आपण केले आहे. या स्पर्धेत कन्याकुमारी ते काश्मीर आणि कामरूख ते कच्छ अशा संपूर्ण भारतातील ३००० विद्यार्थी सहभागी होतील. खेळाडूंचा हा महामेळा केवळ चंद्रपूरसाठी नव्हे तर देशासाठी आकर्षणाचा विषय ठरणार आहे,' असे मुनगंटीवार म्हणाले. स्पर्धेचे आयोजन करणारे सुधीरभाऊ फॅन्स क्लबचे अध्यक्ष श्रीकांत आंबेकर व त्यांच्या टीमचेही मुनगंटीवार यांनी कौतुक केले. ते म्हणाले, 'श्रीकांत आंबेकर व त्यांच्या टीमने एका चांगल्या स्पर्धेचे आयोजन व उत्तम नियोजन केले, त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या टीमचे अभिनंदन करतो. श्रीकांत आंबेकर यांनी माझ्या नावाने बल्लारपूर येथे फॅन क्लब तयार केला व त्या माध्यमाने अनेक सामजिक उपक्रम ते राबवीत आहेत. स्वतःच्या प्रेरणेतून आपल्या मित्रांसोबत त्यांनी हा फॅन क्लब तयार केला. असे प्रेम करणारे कार्यकर्तेच माझा उत्साह वाढवत असतात.



# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन यशस्वी!

## २५०० रुपये भाव देण्याचे केले मान्य!!


आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील शिवणी जामगा येथील ट्वेंटीवन साखर कारखाना येथे १६ सप्टेंबर पासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू केली होते. सदरील आंदोलनकर्ते शेतकरी यांच्या सर्व मागण्या ट्वेंटीवन साखर कारखान्याने मान्य केले असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे, टेव्टीवन साखर कारखाना हा ऊस पट्ट्यातील कारखाना आसुन ५ किलो मीटर अंतरावर गोदावरी नदीच्या काठावर वसलेले १५ ते २० गावातील ऊसचे क्षेत्र मोठे आहे, त्यामुळे येथील शेतकरी नगदी पिक म्हणून ऊसाची लागवड करत असतात या ऊस पट्यातील गावच्या संपर्कात अनेक साखर कारखाने आहेत पण योग्य भाव मिळत असेल तर ईतर दुसऱ्या कारखान्याना आम्ही ऊस देणार नाहीत असे उपस्थित आंदोलनकर्ते शेतकरी यांनी सदरील प्रतिनिधीशी बोलतांना आपले मनोगत व्यक्त केले आहे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेने प्रति टन २७०० रुपये दर देण्याची मागणी केली होती त्या नुसार उर्वरित २०० रुपये साखर दरावर देण्यात येईल असे कारखाना प्रशासनाने लेखी पत्रकाद्वारे देण्यात आले आहे, या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे परभणी जिल्हा अध्यक्ष किशोर ढगे, हानमंत राजगोरे, दामुअण्णा ईगोले, प्रकाश पोफळे, पुर्णा तालुका अध्यक्ष पंडितराव भोसले, अन्न दाता ग्रुपचे रत्नाकर पाटील ढगे, पत्रकार गणपत पाटील जामगे सह बहूसंख्य ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# लोणार येथे शिवसृष्टी निर्माण करा : शिवसेना उ.बा.ठा.

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** येत्या मंत्रिमंडळ बैठकीत लोणार येथे शिवसृष्टी निर्माण करण्याचा निर्णय घ्या, अशी



मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बच्छीरे व तालुका शहर शिवसेनेच्या वतीने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री व पर्यटन मंत्री यांना तहसीलदार मार्फत निवेदन देऊन केली.

बुलढाणा जिल्हा हा शिवछत्रपती शिवाजी राजे यांचा मामकुळाचा जिल्हा आहे. लोणार हे तालुक्याचे शहर जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा पासून साठ कि.मी. अंतरावर आहे लोणार येथे जागतिक कीर्तीचे लोणार सरोवर आहे हे सरोवर पाहण्यासाठी देशातूनच नव्हे तर परदेशातून सुद्धा पर्यटक लोणार सरोवराकडे येतात या सरोवराच्या इको झोन बाहेर, महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवसृष्टी निर्माण करण्यात यावी, या कारणाने पर्यटक लोणार सरोवराकडे जास्तीत जास्त आकर्षित होतील व लोणार मेहकर तालुक्याचा आर्थिक विकास, म्हणजेच बुलढाणा जिल्ह्याचा आर्थिक विकास साधला जाईल. करिता येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदरील बुलढाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून व शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना म्हणून लोणार सरोवराच्या इकोझोन बाहेर शिवसृष्टीची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात यावा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षाचे जिल्हा संघटक डॉ गोपाल बछिरे व शिवसेना लोणार तालुका व शहर कार्यकारणी च्यावतीने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तथा पर्यटन मंत्री यांना मा. तहसीलदार यांच्या मार्फत करण्यात आली.

याप्रसंगी प्रा.डॉ.गोपालसिंह बछिरे यांच्या सह ॲड.दीपक मापारी (तालुका प्रमुख), गजानन जाधव (शहर प्रमुख), परमेश्वर दहातोंडे (तालुका उपप्रमुख), विजय मोरे (संचालक कृ.उ.बा.स.), कैलास अंभोरे (तालुका संघटक), सुदन अंभोरे (ज्येष्ठ शिवसैनिक),श्रीकांत मदनकर( युवासेना श. प्र.) राजूभाऊ बुधवत (विभाग प्रमुख), अश्रूबा धारकर( वाहतूक सेना), ,अजय बछिरे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# इंडियन ऑईल विरोधात धूतूम ग्रामस्थांचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील धूतुम ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या इंडीयन ऑईल टँकिंग अर्थात इंडीयन ऑईल अदानी व्हेंचर्स या कंपनीत गेल्या २५ वर्षात स्थानिक भूमिपुत्रांना नोकरीत सामावून न घेता सतत परप्रांतियांना नोकरीत स्थान दिल्याने स्थानिक भूमिपुत्र अजूनही बेरोजगार राहिला आहे. पर्यायाने सदर कंपनी प्रशासनाने स्थानिक तरुणांना तत्काळ रोजगार द्यावा या प्रमुख मागणीसाठी कंपनी विरोधात २० नोव्हेंबर पासून धुतुम ग्रामपंचायत व ग्रामस्थांतर्फे आमरण उपोषण सुरु झाले आहे.दि २० नोव्हेंबर २०२३ रोजी आंदोलनाचा पहिला दिवस होता. १९९७ साली धुतूम ग्रामपंचायत हद्दीमध्ये इंडीयन ऑईल टँकिंग ही कंपनी सुरू झाली. या कंपनीसाठी सुमारे ८५ शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी संपादित झाल्या.या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना कंपनीच्या नोकर भरतीत सामावून घेण्याचे आश्वासन त्यावेळी देण्यात आले होते.मात्र गेल्या २५ वर्षांत गावातील फक्त तिघांना कंपनीच्या मुख्य कर्मचाऱ्यांत सामावून घेण्यात आले असून बहुतेक कामगार भरती परराज्यातून करण्यात आली.विशेष म्हणजे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाचा जाब गेल्या २५ वर्षात कोणीच विचारला नाही. मात्र सुचिता प्रेमनाथ ठाकूर यांनी सरपंच पदाचा कारभार सुरू करताच आय ओ.टी. एल कंपनीच्या बेलगाम कारभारा विरोधात त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांना रोजगार मिळत नाही.तोपर्यंत हा लढा असाच सुरु ठेवणार असल्याचे धुतुम ग्रामपंचायतचे सरपंच सुचिता प्रेमनाथ ठाकूर यांनी सांगितले. आयओटीएल कंपनीसाठी सुमारे ८५ शेतकऱ्यांनी आपल्या बहुमूल्य जमिनी दिल्याने या कंपनीत त्यांना नोकऱ्या आजपावेतो दिल्या गेल्या नाहीत. याचा जाब सरपंच सुचिता ठाकूर यांनी कंपनी प्रशासनाला विचारला आहे.

# भोकरला हनुमान मूर्तीची प्रतिष्ठापना

## गोरठकर नगरात विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील उद्योजक मारोती गोरठकर यांनी उभारलेल्या गोरठकर नगरातील मंदिरात शूक्रवारी (ता. २४) मान्यवरांच्या हस्ते हनुमान मूर्तीची प्रतिष्ठापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

पंचक्रोशीतील भक्ताची अटळ श्रध्दा असलेल्या हनुमान मंदीराची उभारणी करण्यात आली असून सदरील मंदिर सर्वधर्म समभावाचं प्रतिक मानलं जाईल. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी ११ ते २ पर्यंत होमहवन, पुजाविधी श्री गुरु रवि महाराज यांच्या मार्गदर्शनातून होम मंत्रोपचार विधि संपन्न होईल शनिवार (ता. २५) सकाळी ८ ते १० पर्यंत होमविधी व मुर्तीचा अभिषेक व स्थापना श्री ब्रम्हचारी गुरू उत्तमबन ध्यानबन महाराज कैलास गड भोकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या प्रसंगी विठ्ठल महाराज, गुरू बाळगीर महाराज,बाळु महाराज, विश्वनाथ कदम महाराज, बाबा कपाटे महाराज यांच्या हस्ते हनुमान मुर्ती प्रतिष्ठापणा संपन्न होणार आहे. शनिवारी सकाळी १०.३० वाजता भागवताचार्य माधव महाराज बोरगडीकर यांचे किर्तन होणार आहे.दुपारी १ नंतर महाप्रसाद होणार आहे. यावेळी गणेश काकीलवाड भजनी मंडळ भोकर यांच्या भजनाचा कार्यक्रम होईल. भाविकांनी सदरील सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक मारोती गोरठकर (उद्योजक) यांनी केले आहे.





# आ.फारुख शाह यांच्या वतीने २२ निराधार जोडप्यांचा सामूहिक विवाहसोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दि.20 नोव्हेंबर सोमवार रोजी आ.फारुख शाह यांच्यावतीने 22 निराधार वधूवरांचा विवाह सोहळा संपन्न झाला या विवाह सोहळ्यात अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती नोंदवून वधू-वरांना आशीर्वाद दिला. धुळे शहराचे आ.फारुख शाह यांच्या वतीने दरवर्षाला दोन वेळेस गरीब विधवा परितक्त्या यांच्या मुलामुलींच्या लग्नाची जबाबदारी आ.फारुख शाह घेतात व वर्षातून दोनदा आ.फारुख शाह यांच्या वतीने सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते या सामूहिक विवाह सोहळ्यात उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार धुळे जळगाव नाशिक मालेगाव नवापूर भुसावळ व अशा अनेक शहरातील वधू-वरांचे नातेवाईक उपस्थित होते. लग्न आ.फारुख शाह, स्वतः आपल्या खर्चाने करतात तसेच वधु वरांना संसार उपयोगी वस्तू, वराडी मंडळींना जेवणाचा खर्च सुद्धा आ.फारुख शाह यांच्या वतीने करण्यात येतो. हा लग्न सोहळा चौथा लग्न सोहळा असून आ.फारुख शाह यांच्या वतीने शेकडो निराधार कुटुंबांना यामुळे आधार मिळालेला आहे ज्या गरीब कुटुंबांना मुला मुलींचे लग्नासाठी पैसे उपलब्ध नसतात अशा विधवा परितक्त्या व गरीब मुला मुलींचे लग्न आ.फारुख शाहहे नगरसेवक असताना सुद्धा करून देत होते यामुळे अनेक लोकांचे संसार सुरू झाले आहे या सामूहिक विवाह सोहळ्यात अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती नोंदवून नवीन वधूवरांना आशीर्वाद दिला आ.फारुख शाह यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे अनेक लोकांनी समाधान व्यक्त केले व आ.फारुख शाह यांना आशीर्वाद दिलेले आहे हे विवाह सोहळ्या संपन्न करण्यासाठी भिखन हाजी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या कार्यरत होत्या. या विवाह सोहळ्यास धुळे मालेगाव येथील माजी नगरसेवक रहेमान पहेलवान, माजी उपमहापौर मालेगाव एजाज बेग, इफ्तेकार अहमद अन्सारी मुन्ना शेठ,गुफरान पोपटवाले,माजी नगरसेवक युसुफ खाटीक,माजी नगरसेवक अनिस शाह,हाजी सलीम शाह, छोटू शाह,एम आय एम पार्टीचे जिल्हाध्यक्ष नासिर पठाण शहराध्यक्ष मुक्तार बिल्डर नगरसेवक गनी डॉलरआमिर पठाण नगरसेवक नगरसेवक सईद बेग, माजी नगरसेवक फिरोज लाला, माजी नगरसेवक साजिद साई आदी उपस्थित होते. सर्व २२ जोडप्यांच्या विवाहाची कार्यवाही मुफ्ती कासिम जीलानी यांनी पार पाडली.तर त्यांना मौलाना अब्दुल रहेमान,हाफिज खालील यांनी बहुमूल्य सहकार्य केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आमदार फारुख शाह यांचे समर्थक कार्यकर्ते आणि एम.आय. एम.पक्षाच्या विद्यार्थी आघाडी,महिला आघाडी आणि जिल्हा समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांना नियमित औषधोपचार करा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** क्षयरोग दूर करण्यासाठी समाजात असलेले क्षयरुग्ण शोधून त्यांना औषधोपचाराखाली आणणे व या रोगाचा संसर्ग कमी करणे हा राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम व राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुसार आरोग्य विभागाने संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांना नियमित औषधोपचाराखाली आणावे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या.

जिल्हा टिबी फोरम समितीचा आढावा घेतांना ते बोलत होते. वीस कलमी सभागृहात आयोजित या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. ललितकुमार पटले, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रकाश साठे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्णांना शोधून त्यांचे निदान करण्यासाठी तपासणी करावी व क्षयरुग्ण आढळल्यास त्याला औषधोपचाराखाली आणून बरे करावे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम व राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोधमोहिम जिल्हयामध्ये 20 नोव्हेंबर ते 6 डिसेंबर 2023 या कालावधीत राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान ग्रामीण भागातील 100 टक्के आणि शहरी भागातील 20 टक्के लोकसंख्येची तपासणी घरोघरी जाऊन आरोग्य चमुमार्फत करण्यात येणार आहे. आरोग्य चमू घरी आल्यास नागरीकांनी कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण तपासणीसाठी सहकार्य करावे तसेच निदान करून उपचार घ्यावेत.



# सर्वसामान्य लोकांना लोकशाही समजून सांगणे मोठे आव्हान : प्रा. डॉ. इंजेगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**'आरक्षणप्रणाली संपुष्टात आणण्याचे षडयंत्र!'**
विकासाच्या अनेक प्रश्नांना सोयीस्करपणे बगल देत राज्यकर्त्यांनी आरक्षण हा अत्यंत संवेदनशील आणि प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला आहे . आरक्षण वर्गीकरण, मुस्लिम, धनगर, मराठा आरक्षणाच्या माध्यमातून दोन समाज एकमेकांसमोर उभे राहावेत आणि आपसांत लढावेत हे एक मोठे कटकारस्थान आहे . धर्म, पुतळे, जातीय अस्मिता यावरून दंगली घडवून आणण्यापेक्षा आरक्षणावरुन दंगल घडवून आणण्याचा आणि आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा येथील राजकारण्यांचे मनसुबे असल्याचा आरोप यावेळी डॉ . इंजेगावकर यांनी केला . तसेच आरक्षणाच्या मुद्द्यावर इतके रान पेटविले आहे की, कुणालाच आरक्षण नको अशी लोकांची मानसिकता व्हावी ! याऊलट
नवीन पेन्शन योजना, खाजगीकरण आणि कंत्राटीकरणाच्या माध्यमातूनही आरक्षण प्रणाली संपुष्टात आणण्याचे सरकारचे षडयंत्र असल्याचे ते म्हणाले .

**नांदेड :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाहीला अधिक महत्त्व दिले आहे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाही असल्याशिवाय ती टिकू शकत नाही. याता लोकसमुहाचा मोठे योगदान असणे आवश्यक आहे. सर्वसामान्य लोकांना लोकशाही समजून सांगणे हेच भारतीय लोकशाही समोरील मोठे आव्हान असल्याचे प्रतिपादन भारतीय संविधान संस्कृतीचे अभ्यासक तथा पाथरी येथील स्व. नितीन महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्रपाठक प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर यांनी केले. यावेळी बालाजी थोटवे, प्रज्ञाधर ढवळे, अनुरत्न वाघमारे, गोविंदराम शुरनर, संजय मोरे, प्रकाश कदम, डॉ. जिरवणकर, डी. एम. हनमंते, एस. एम. गोरे, प्रा. जी. एल. सूर्यवंशी, क्रांती गोडसे महाराज यांची उपस्थिती होती. अखिल भारतीय शोषित पिछडा संघटनेच्या वतीने सत्यशोधक समाज स्थापना शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर दरमहा एक अशा व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. वस्ताद लहूजी साळवे जयंती आणि भारतीय संविधान दिनाच्या औचित्याने 'भारतीय लोकशाही पुढील आव्हाने' या विषयावर मालेतील दुसरे पुष्प गुंफताना डॉ. आनंद इंजेगावकर म्हणाले की, भारतामध्ये अजूनही भारतीय संविधान आणि लोकशाही याबाबत जागरूकता निर्माण झालेली नाही. आजही लोकांना मतदान करणे आणि निवडून देणे हीच लोकशाही असे वाटते. ब्राह्मणशाही, भांडवलशाही, परिवारशाही, मताधिकारांचा आणि राजकीय सत्तेचा गैरवापर, राजकीय प्रदुषण या लोकशाही समोरील आव्हानांबरोबरच त्या आधी सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी सर्वसामान्य लोकांना लोकशाही समजून सांगणे हेच मोठे आव्हान असल्याचे त्यांनी सांगितले. सिडको परिसरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वाचनालयात आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमाला कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीगुरु वस्ताद लहूजी साळवे, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पपूजन करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सत्यशोधक समाज प्रार्थना घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिलीप काठोडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश चुटकूलवार यांनी तर आभार सतीश शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाला परिसरातील विचारवंत श्रोत्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोधमोहीम सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोध मोहीम सुरु २० नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली असुन चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्र तसेच संपुर्ण जिल्ह्यात सदर अभियान राबविण्यात येत आहे.

कुष्ठरोग आणि क्षयरोगाच्या समूळ निर्मूलनासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत या मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येणार असुन केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे या संयुक्त अभियानाची आखणी आणि नियोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणणे, नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, क्षयरोगाच्या निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या रुग्णांचा शोध घेऊन त्यांना औषधोपचारावर आणणे तसेच समाजात क्षय व कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. सदर कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागामध्ये आशा स्वयंसेविका, पुरुष स्वयंसेवक व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत कुटुंबातील प्रत्येक व्यक्तींची कुष्ठरोग व क्षयरोगाची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर,संशयीत कुष्ठरुग्ण व क्षयरुग्णांची तपासणी करून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत निदान करण्यात येणार आहे. यात महानगरपालिका कार्यक्षेत्रात जोखीमग्रस्त व झोपडपट्टी भागातील एकूण २३९९८ घरातील १०३८२९ नागरिकांचा सर्व्हे करण्यात येणार असुन त्याद्वारे कुष्ठरोग व क्षयरोग रुग्णांचा शोध घेणार आहे. मनपाच्या एकूण १४ पर्यवेक्षकांच्या नियंत्रणात ६९ पथकांमार्फत हि शोध मोहिम राबविल्या जाणार आहे. प्रत्येक पथकामध्ये एक महिला व पुरुष कर्मचारी राहणार असुन प्रत्येक घरातील महिलांची तपासणी महिला कर्मचाऱ्यांमार्फत तर पुरुषांची तपासणी पुरुष कर्मचाऱ्यामार्फत केली जाणार आहे. कुष्ठरोग व क्षयरोगाची लक्षणे यात तपासण्यात येणार असुन लक्षणे आढळल्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे निदानासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. आयुक्त विपीन पालीवाल - संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोध मोहीमेत आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन आरोग्यासंबंधी जनजागृती करण्यात येणार असल्याने सर्व नागरिकांनी घरी भेट देणाऱ्या मनपा आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत आपल्या आरोग्याची तपासणी करून सहकार्य करावे. **कुष्ठरोगाची लक्षणे -** त्वचेवर लालसर बधीर चट्टा,त्याठिकाणी घाम न येणे,बधिर तेलकट चकाकणारी त्वचा,त्वचेवर गाठी असणे,कानाच्या पाळ्या जाड होणे,भुवयांचे केस विरळ होणे,डोळे पुर्ण बंद न करता येणे इत्यादी लक्षणांची विचारणा व पाहणी या मोहीमेत करण्यात येणार आहे.




# विष्णू मनोहर यांनी तयार केला दहा हजार किलो मसाले भात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** १८०० किलो तांदूळ, ५०० किलो बटाटे, ३०० किलो तेल, १०० किलो मिरची, तीनशे किलो मटर, पाचशे किलो बटाटे, पाचशे किलो कांदे आदी साहित्याचा उपयोग करत प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी दहा हजार किलो मसाले भात तयार केला. निमित्त होते आदिवासींचा मेळावा, आदिवासींमधील अनेक समूह आणि जाती ख्रिश्चन तसेच मुस्लीम झालेले आहेत. त्यांना त्यांच्या मूळ जातीनुसार ओबीसी व अनुसूचित जातीच्या सवलती मिळत आहे. त्या बंद करण्यात याव्या यासाठी जनजाती सुरक्षा मंचतर्फे ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी महामेळावा आयोजित करण्यात आला.

# श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात पौर्णिमोत्सव कार्यक्रम उत्साहात

## श्रीलंकेहून परतलेल्या बौद्ध उपासक उपासिकांचा हृद्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** बौद्ध उपासक उपासिकांनी मोठ्या प्रमाणावर दान पारमिता केली पाहिजे. तसेच धम्माच्या प्रचार प्रसारासाठी शहर तथा गाव-खेड्यांत मोठ्या प्रमाणावर बौद्ध विहारांची निर्मिती झाली पाहिजे असे प्रतिपादन गणेश शिंगे यांनी केले. ते खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात आयोजित पौर्णिमोत्सव कार्यक्रमात बोलत होते. यावेळी येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो, श्रामणेर भिक्खू संघासह आर. पी. झगडे कोकलेगावकर, प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर, पीआय भगवान धबडगे, अनुरत्न वाघमारे, प्रज्ञाधर ढवळे, विशालराज वाघमारे, बळीराम मल्हारे, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, सिद्धार्थ थोरात, अनिल जल्हारे, शंकर गोडबोले, गौतम जाधव, महेंद्र जाधव आदींची उपस्थिती होती. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात दरमहा पौर्णिमेनिमित्त १९ तारखेला विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. येणाऱ्या कार्तिक पौर्णिमेचे औचित्य साधून पौर्णिमोत्सव कार्यक्रमांतर्गत सकाळपासून परित्राणपाठ, धम्मध्वजारोहण, त्रिरत्नवंदना, बोधीपुजा, सूत्तपठण, ध्यानसाधना, धम्मदेसना व्याख्यान, भोजनदान, आर्थिक दान पारमिता आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच बौद्ध राष्ट्र श्रीलंका येथे धम्माभ्यास करण्यासाठी गेलेल्या पन्नास बौद्ध उपासक उपासिकांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपासकांच्या याचनेवरुन भिक्खूंनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. त्यानंतर ध्यानसाधना, त्रिरत्न वंदना, धम्मदेसना, भोजनदान आदी कार्यक्रम संपन्न झाले. तसेच सुभाष लोकडे आणि संचाचा बुद्ध आणि भीमगितांचा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न झाला.



दरम्यान, बौद्ध राष्ट्र श्रीलंका येथील धम्माभ्यास करुन परतलेल्या बौद्ध उपासक उपासिकांचा हृद्य सत्कार करण्यात आला. त्यातसुजाता शेळके, सिया शेळके , शिवाजी शेळके, कांताबाई मस्के, वैजयंती वाघमारे, तुकाराम वाघमारे, कल्पना कांबळे, अशोक कांबळे, निर्मला बिल्लाळीकर, हनमंत बिल्लाळीकर, सुंदरबाई मल्हारे, ज्योती गजभारे, प्रल्हाद गजभारे, प्रफुल्लता वाठोरे, विलास वाठोरे, वंदना जोंधळे, शामराव पवळे, छाया जाभाडे, संभा कांबळे, रेखा नरवाडे, उषा नरवाडे, प्रतिभा नरवाडे, तुळशीराम नरवाडे, प्रतिक, रामराव, वंदना, प्रज्वल, ललिता जोगदंड, गौतम जोगदंड, आशाबाई जाधव, मीराबाई गोवंदे, भगवान गोवंदे, निलाबाई मस्के, पृथ्वीराज तोंभळे, नाथा पंडित, सुशीलकुमार धबडगे, दीपंकर रोडे, गौतम जाधव, बी. एम. मल्हारे, अनिता डोंगरे, श्रीरंग डोंगरे, केशरबाई अश्वजित पाठोडे, भारतबाई देवके, भीमराव देवके, रिया शेळके, निला भीमराव भद्रे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजीत गोणारकर यांनी केले. तर आभार टी. पी. वाघमारे यांनी मानले.

# जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हा

## 25 नोव्हेंबरपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** युवकांचा सर्वांगीन विकास करणे, संस्कृती व परंपरांचे जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे, यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. राज्यात सन 2023-24 या वर्षातील युवा महोत्सवाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय तसेच कृषी आयुक्तालय, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे.

चंद्रपूर येथे होणाऱ्या जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, महिला मंडळ यांनी आपल्या अधिनस्त युवक-युवतींना युवा महोत्सवामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी होण्याकरीता 25 नोव्हेंबर 2023 पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे प्रवेश निश्चित करण्याकरिता सुचित करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे. युवा महोत्सवामध्ये (1) सांस्कृतीक, समुह लोकनृत्य, वैयक्तिक सोलो लोकनृत्य, लोकगीत, वैयक्तिक सोलो लोकगीत, (2) कौशल्य विकास, कथा लेखन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, इंग्रजी व हिंदी फोटोग्राफी, (3) संकल्पना आधारीत स्पर्धा, तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर, सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान, (4) युवा कृती, हस्तकला, वस्त्रोद्योग, ॲग्रो प्रोडक्ट या स्पर्धात्मक बाबींचे आयोजन करण्यात येणार आहे.

युवा महोत्सवासाठी आवश्यक पात्रता : जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ, युवा मंडळे तसेच 15 ते 29 वयोगटातील युवांना सदर महोत्सवामध्ये सहभाग घेता येईल. सदर युवक युवती महाराष्ट्राचा रहिवासी असावा. स्पर्धकांनी नाव, पत्ता, जन्म दिनांक, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी व वयाबाबतचा सबळ पुरावा सुध्दा सादर करणे आवश्यक आहे. सहभागी युवक, युवतींना सहभाग व प्राविण्य प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल. तसेच युवा महोत्सवातील प्राविण्यधारकांसाठी रोख पारितोषिक देण्यात येणार आहेत.

# इन्स्टाग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट, बुलढाण्याच्या बोरी अडगावमध्ये तणाव

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्याच्या खामगाव तालुक्यातील बोरी अडगाव गावातील युवकाने इन्स्टाग्रामवर आक्षेपार्ह मजकूर (पोस्ट) टाकल्याने गावात तणाव निर्माण झाला. गावकऱ्यांनी टायर जाळून व गावबंद करून घटनेचा निषेध नोंदवला. यामुळे पोलिसांचा मोठा फोजफाटा गावात तैनात करण्यात आला असून गावाला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

एका युवकाने इन्स्टाग्रामवर छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांच्या संदर्भात आक्षेपार्ह मजकूर टाकल्याचे आज, मंगळवारी लक्षात आले. परिणामी गावकऱ्यांत तीव्र प्रतिक्रिया उमटली. गाव बंदचे आवाहन करून रस्त्यावर टायर जाळण्यात आले. गावामध्ये खामगाव पोलिसांचा मोठा फौजफाटा दाखल झाला असून सध्या तेथे तणावपूर्ण शांतता आहे. सदर युवकाला पोलिसांनी तत्काळ अटक केल्याने तणाव काहीसा निवळला आहे.



# शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी सरसावले पालकमंत्री मुनगंटीवार

## पिकांच्या नुकसानीबाबत मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पावसातील खंड, अनियमित हवामान



यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन व कापसाच्या पिकांवर मोठ्या प्रमाणावर रोगाचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे पिकांची मोठी हानी झाली. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासादायक नुकसान भरपाईची गरज असून यासंदर्भात निर्देश देण्याबाबत राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्र देत मागणी केली आहे.

सोयाबीन पिकावर मुळकुज, खोडकुज, रायझेक्टानिया एरीयल ब्लाईट आदी रोगांचा प्रादुर्भाव झाला होता. या पिकांची श्री. मुनगंटीवार यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती. पिकांच्या नुकसानाची कारणमिमांसा तसेच भविष्यात उपाययोजना करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ज्ञांनी संयुक्त पाहणीचे निर्देश श्री. मुनगंटीवार यांनी दिले होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ज्ञांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतशिवारात जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीच्या आधारे तज्ज्ञांनी शासनाला अहवाल सादर केला आहे.

आपत्तीच्या या काळात शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे, असे नमूद करीत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पंचनाम्यांच्या अहवालाच्या आधारावर चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासादायक नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



